## प्रकरण तीन

# *बाजीरावाच्या काळातील मराठ्यांचा साम्राज्य विस्तार*

छत्रपती शाहूचा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ १७२० मध्ये मरण पावला. त्याची मराठ्यांच्या इतिहासातील सेवा लक्षात घेऊन शाहूने त्याचाच मुलगा बाजीराव याला १७ एप्रिल १७२० रोजी आपला पेशवा नेमले. बाजीराव अत्यंत दूरदर्शी आणि धोरणी होता. तत्कालीन राजकीय परिस्थितीचे त्याने बारकाईने परीक्षण केले होते. तोही पित्याबरोबर दिल्लीस गेला होता. मराठ्यांची वाढती शक्ती आणि मोघल साम्राज्याची दुर्बलता याने बरोबर ओळखली होती. मोडकळीस आलेल्या मोगल साम्राज्याच्या भग्नावशेषावर मराठ्यांचे साम्राज्य निर्माण करण्याची त्याला उमेद होती. डॉ.दिघे त्याच्या साम्राज्यवादी धोरणाबाबत लिहीतात, ''बाजीरावाला दक्षिण भारतात प्रभुत्व व उत्तर भारताचे नेतृत्व प्राप्त करावयाचे होते.''[१]

मराठ्यांच्या चढाऊ धोरणाचा पहिला कट्टर पुरस्कर्ता बाजीरावच होय. सुमारे २५ वर्षे दक्षिणेतच औरंगजेबाने ठाण मांडल्याने त्यावेळी मराठीशाहीचे धोरण बचावात्मक होते. परंतु बचावासाठी चढाईचीच जरुरी असते हे अचूक युध्द तत्व पेशवा बाळाजी विश्वनाथाने मराठा सरदार मंडळाला अचूक शिकविले होते. कर्तबगार बाजीरावाने आपल्या पित्याच्याच पावलावर पाऊल टाकून मोघल सत्तेस आव्हान देण्याचे ठरविले.

श्रीपतराव प्रतिनिधी बाजीरावाचा कट्टर विरोधक होता. शाहूच्या दरबारात पेशवा आणि प्रतिनिधी असे दोन गट होते. प्रतिनिधीसह अन्य मराठे सरदार बाजीरावाच्या विस्तारवादी धोरणाचे विरोधक होते. परंतु बाजीरावाने या विरोधाचा विचार न करता आपले विस्तारवादी धोरण पुढे रेटलेच. परिणामी त्याला अंतर्गत आणि बहिर्गत शत्रूंना तोंड द्यावे लागले. या शत्रूंमध्ये त्याला सर्वप्रथम तोंड द्यावे लागले ते निजामाला.

हा निजाम म्हणजे औरंगजेबाच्या चाकरीत असलेल्या गाजीउद्दीन फिरोजजंगचा मुलगा होय. त्याचा जन्म १६७१ मध्ये झाला. १६८२ ते १७०७ पर्यंत त्याने औरंगजेबाबरोबर दक्षिणेत वास्तव्य केले. हा दक्षिणेचा अनुभव निजामाला पुढील काळात उपयुक्त ठरला. सन १७१३ मध्ये फरुकसिअर बादशहाने निजामाची दक्षिणेच्या सुभेदारीवर नियुक्ती केली. याचवेळी निजामास निजाम-उल-मुल्क खानखानान ही पदवी देण्यात आली. प्रत्यक्ष स्वतंत्र राज्याची १७२४ मध्ये त्यानेच स्थापना केली. दिल्लीच्या बादशहाबरोबर तो आभासात्मक निष्ठा ठेवून असला तरी दक्षिणेमध्ये स्वतः सुभा निर्माण करावा असे विचार त्याच्या मनामध्ये दक्षिणेच्या पहिल्या सुभेदारीच्या वेळेस डोकावले नसतील असे नाही.[२] सन १७२० मध्ये छ.शाहूची बाजीरावाने भेट घेतली आणि आपले राजकारण स्पष्ट केले. बाजीराव म्हणतो, ''स्वसामर्थ्याने शत्रूस वठणीवर आणल्याशिवाय राज्य चालणार नाही. पूर्वी वडिली मोठी कार्ये केली, तशी न करावी. तरी मोठी पदे कशाला घ्यावी? आम्हास हुकूम करा. फौज खजिना सर्व स्वामी चरणांचे प्रतापे करुन सिध्द करितो. राज्य साधतो, हिंदूस्थानची मसलत करतो. वडिलांचा उद्देश पूर्ण करणे जरुरी आहे.''[३]

शाहू महाराजांनी बाजीरावाच्या या विचारास तात्काळ संमती दिली. शाहू महाराज बाजीरावाच्या वरील धोरणास

संमती देताच आणि शिवाय त्याचबरोबर बाजीराव स कळवितात की, ''तुम्ही नबाबाचे नजिक राहू नये. तुम्ही त्याच्या गोष्टीत मन घालावेसे नाही. त्याच्या स्नेहास अंतर करु नये. नबाबाची मर्जी राखावी. नबाबाशी कलह न केला पाहिजे.''[४] यावरुन डॉ.खोबरेकर म्हणतात की, ''बाजीराव-निजाम एवढ्या लढायात तह करार मदार होवूनही निजाम शिल्लक राहिलाच याला खुद्द शाहू महाराजच कारण ठरले, असे म्हटले पाहिजे.'' मात्र या ठिकाणी हेही लक्षात घ्यावे लागेलच की पेशव्यांनीही निजामाकडून माळव्याचा सुभा घेतला होता व एकप्रकारे शाहूप्रमाणे त्यांनीही निजामाची ताबेदारी स्विकारली होती. दुसरे म्हणजे निजामाचा तोफखाना प्रबळ राहिला म्हणूनच बाजीराव त्याला कोंडू शकला. परंतु त्याच्या सैन्याचा पूर्ण लष्करी पराभव करु शकला नाही. तसेच पेशव्याच्या निजामाशी वागण्याच्या धोरणावरुन त्याचा प्रदेशाचा स्वार्थ व लष्करी कमकुवतपणाही सिध्द होतोच. म्हणूनच प्रा.शेजवलकर, निजाम महाराष्ट्राला जो पुरुन उरला तो पेशव्यांमुळेच[५], असे जे म्हणतात तेच खरे. तथापि या ठिकाणी मराठ्यांच्या विस्तारवादाच्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी निजाम-पेशवे जो हर्षामर्ष घडून आला त्याची दखल घेणे भाग आहे. तशी ती घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## चिखलठाणा भेट –

बाजीराव-निजाम यांच्यात एकूण ६ भेटी झाल्या. त्यापैकी पहिली भेट ४ जानेवारी १७२१ रोजी चाळीसगांव जवळील चिखलठाणा येथे झाली. तथापी त्या भेटीतून काहीच निष्पन्न झाले नाही. पण बाजीरावाने स्वसामर्थ्यावर भिस्त ठेवण्याचा निश्चय केला. इकडे बादशहाची निकडीची पत्रे आल्याने मुबारीचखानास आपला दुय्यम नेमून निजाम उत्तरेत गेला. मुबारीचखानाने मराठ्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. दिल्लीस गेल्यानंतर निजामाचे व बादशहाचे पटले नाही. मराठ्यांच्या बंदोबस्ताचे कारण सांगून तो दक्षिणेस जाण्यासाठी माळव्यातून निघाला. सन १७२२ च्या दसऱ्यानंतर बाजीरावही खानदेशातून माळव्यात आला. निजाम लवकरच औरंगाबादला पोहोचला. तारीख २२ जून १७२४ ला तो औरंगाबादला पोहोचताच त्याला मुबारीचखानाच्या संकटाची चाहूल लागली. तो त्या संकट निवारणाच्या कार्यास लागला. निजामावरचे हे संकट दूर करण्यासाठी छ.शाहू महाराजांनी बाजीरावास निजामाच्या मदतीस पाठविले.[६] मराठे आणि निजाम यांच्या एकत्रित सैन्याने मुबारीचखानाचा साखरखेडा येथे ११ ऑक्टोबर १७२४ रोजी पराभव केला. मराठ्यांच्या मदतीने निजामाने मुबारीचखानावर विजय मिळविला पण इतिहासात विजयाची नोंद मात्र निजामाच्या नावावर झाली.

साखरखेडा युध्दानंतर आपण संपूर्ण दक्षिणेचा बंदोबस्त करु व मराठे नर्मदा ओलांडणार नाहीत याची दक्षता घेऊ असे निजामाने बादशहास कळविले. बाजीरावाचा त्याने सत्कार केला. पण हे सर्व वरवरचे होते. मराठ्यांना शह देण्याचे राजकारण निजामाने चालूच ठेवले होते. अशा पार्श्वभूमीवरच निजाम आणि पेशवा यांची पालखेड येथे पहिली लढाई णाली.

## पालखेडची लढाई -

निजामाने कोल्हापूरकर संभाजीला हाताशी धरुन शाहूला साफ उखडण्याचा डाव रचला. तेव्हा, शाहू, सुमंत व प्रतिनिधी यांचे डोळे उघडले. पुण्याच्या रोखाने येणाऱ्या ऐवजखानास तुकोजी पवारने सिन्नर येथे रोखले. सिन्नरचा देशमुख जो निजामास मिळाला होतात तो पराभूत झाला. फत्तेसिंग भोसले व रघुजी भोसले यांनी चंद्रसेन जाधवाचा समाचार घेतला. निजामाने लोहगड घेतला व तो चिंचवडवरुन पुण्यास निघाला. पुण्यास संभाजीला राजा म्हणून घोषीत केले. पुण्यात निजामाने धुमाकूळ उडविला. पेशवा पुण्याच्या रोखाने येत आहे असे समजताच निजाम बारामती पेडगांववरुन नगरला गेला. निजामाजवळ उत्कृष्ट तोफखाना होता. बाजीरावाने पुणतांब्याजवळ गोदावरी ओलांडून जालना व सिंदखेड बेचिराख केले. अशा परिस्थितीत निजामाचा सरदार ऐवजखान बाजीरावास सामोरा आला. त्याचा ५ नोव्हेंबर १७२७ रोजी बाजीरावाने पराभव केला. पुढे बाजीराव वायूवेगाने वऱ्हाडात निघाला. वाटेत माहूर, वार्सीद, मंगलूर हे तालुके त्याने जिंकून घेतले. गुजराथेत जाऊन सर बुलंदखानाशी निजामाविरुध्द मैत्री जोडली. आपण बऱ्हाणपूर जाळणार अशी आवईही बाजीरावाने उठविली. त्यामुळे निजामाला बाजीरावावर धाव घ्यावी लागली. परिणामी निजाम-पेशवा यांची भेट पालखेड येथे पडली. पालखेडला निजामाच्या सैन्याला मराठी सैन्याने गराडा घातला. निजामाचे बाहेरच्या जगाशी संबंध साफ तुटले. निजामाच्या हालअपेष्टांना सीमा राहिली नाही. परिणामी त्याने ऐवजखानामार्फत ६ मार्च १७२८ रोजी तह केला. तो तह म्हणजेच मुंगी-शेगावचा तह होय. त्यातील काही महत्वाची कलमे पुढीलप्रमाणे -[७]

१) दक्षिणेतील सहा सुभ्यातील राज्यकारभाराची व्यवस्था मराठ्यांच्या अनुमतीने व्हावी. तसे करताना मराठे बादशहाचे हितच पहातील.

२) आनंदराव सुमंत हा पेशव्याचे नोकरीत असल्याने त्यात वकील म्हणून ठेवून घेवू नये. आम्ही दुसरा कोणीतरी पाठवू.

३) संभाजी राजास निरोप देऊन निजामाने पन्हाळ्यास रवाना करावे. निजामाने जप्त केलेली ठाणी मोकळी करुन पेशव्याच्या हवाली करावीत. निजामाने दक्षिणच्या सहा सुभ्यांचा चौथाई आणि सरदेशमुखीच्या सनदांना मान्यता द्यावी. संभाजी राजे यांना कृष्णा पंचगंगा यामधील मुलूख आम्ही दिला आहे, त्या व्यतिरिक्त जादा आपण न द्यावा.

या तहानंतर निजाम आणि बाजीराव यांच्यात वस्त्रांच्या भेटी होवून ते एकमेकांस भेटले. निजामावर पालखेड येथे बाजीरावाने अथवा मराठ्यांनी विजय संपादन केला त्याचे श्रेय मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व तुकोजी पवार यांनाही द्यावयास हवे. कारण हे सरदार जीवास जीव देऊन लढण्यास सिध्द होते.

## पालखेड विजयाचे मराठ्यांच्या दृष्टीने महत्व -

निजामाने मुंगी-शेगावचा तह मान्य करुन मराठे हे आपल्यापेक्षा बलवान व सत्तावान आहेत हे मान्य केले.

दक्षिणेत आपणच सर्व शक्तीमान आहोत. शाहू महाराजांची तिरपीट केव्हाच उडवून देवू अशी जी निजामास घमेंड होती ती नाहीशी झाली. दक्षिणच्या सहा सुभ्यांवरील मराठ्यांच्या चौथाई आणि सरदेशमुखीच्या हक्कास निजामाकडून मान्यता मिळाली. या हक्कांना तो आतापर्यंत मान्यता देत नव्हता. ही मान्यता देणे त्याला भाग पडले. त्यामुळे आपले स्वातंत्र्य गमावून दक्षिणेत मराठ्यांच्या स्वैरसंचारास त्याने मोकळीक करुन दिल्यासारखेच झाले. त्यामुळे मराठ्यांच्या आक्रमणास कायदेशीरपणा आला. यापुढे मराठे आणि निजाम यांचे लढे झाले. पण चौथ आणि सरदेशमुखीच्या हक्कांविरुध्द निजामाने ब्र काढला नाही. अशारितीने मराठ्यांचे दक्षिणेतील राजकीय वर्चस्व निजामाने कबूल केले.

या विजयाचा एक अप्रत्यक्ष परीणाम असा झाला की प्रतिनिधी, कान्होजी भोसले, दाभाडे, सरलष्कर, भोसले, निंबाळकर या जुन्या सरदारांवर नाकर्तेपणाचा शिक्का बसून स्वराज्यात त्यांची कर्तबगारी मागे पडली. बाजीराव आणि चिमाजी आप्पा यांची ताकद प्रकट झाली.

मराठ्यांच्या सत्तेच्या वृध्दीचे क्षेत्र उत्तर हिंदुस्थानातच आहे असे बाजीरावाने ठरविले. आणि पालखेड जिंकल्यानंतर त्याने आपला रोख माळवा, बुंदेलखंडावर वळविला. त्यातून गुजरातेत बाजीराव-दाभाडे संघर्ष घडून येवून दाभाडे ठार झाला. पण त्याची जहांगीर त्याच्याच मुलास देवून बाजीरावाने आपले औदार्य प्रकट केले. दाभाड्यांना उपद्रव देवू नये असेही बाजीरावाने सचिवांस सांगितले.[८]

## निजाम आणि बाजीराव यांच्यातील एक अप्रसिध्द लढाई -

निजाम आणि बाजीराव यांच्यात पालखेड येथे सन १७२८ व भोपाळ येथे सन १७३७ अशा दोन लढाया झाल्या, असे आजवरच्या इतिहासावरुन दिसून येते. पण बाजीराव आणि निजाम यांच्यात वरील दोन लढायांशिवाय सन १७३१ मध्ये दमणजवळ लढाई झाली. गुजरातेतून पुण्यास येण्यास दोन मार्ग. एक खानदेश-संगमनेर-पुणे व दुसरा सुरत-जव्हार-कल्याण-माळसेज घाट-जुन्नर आणि पुणे. दुसऱ्या मार्गावरुन दमणवरुन यावे लागते. बाजीराव दुसऱ्याच मार्गाने आला. कारण यशवंतराव ब्रम्हेंद्र स्वामीस लिहीतो की, ''प्रधानपंत रेवा उतरवून आंबुलेश्वरावर आले. बाजीराव प्रधान नर्मदा बाबापीराच्या घाटे उतरुन अलिकडे आले.'' असे जिवबा हा पेशव्याचा नोकर ब्रम्हेंद्र स्वामीस लिहीतो. पेशव्यांच्या मागे दाभाडे यांच्या फौजा आहेत व त्यांच्यापुढे सागावच्या अंतराने किलीचखान व बंगश आहे. याचा हर्षमर्ष होणार आहे. उदाजी पवार आणि चिमणाजी दामोदर या उभयंतांस वस्त्रे आणि हत्ती दोघांस दोन देऊन सोडविले. याचा अर्थ निजाम बाजीराव यांची दमणजवळची लढाई ८ एप्रिल १७३१ ते ९ मे १७३१ या दरम्यान झाली असली पाहिजे.[९] या लढाईत बाजीरावाने निजामाचा पराभव करुन त्यास एक तह मान्य करण्यास भाग पाडले. त्यानुसार निजामाने बाजीरावाच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांचे वेळी त्याला अडथळा करु नये व बाजीरावाने निजामाच्या दक्षिणेतील मुलखावर स्वाऱ्या करु नये असे ठरले.[१०]

## रोहे-रामेश्वर येथे बाजीराव-निजाम भेट -

बाजीराव आणि निजाम यांच्यात रोहे-रामेश्वर येथे झालेली भेट ही प्रसिध्द आणि महत्वाची होय. ती २७ डिसेंबर १७३२ रोजी झाली. ही भेट होवू नये असे अनेकांनी बाजीरावांस सुचविले. खुद्द मातोश्रीबाईनीही तसे कळविले होते. तथापी भेट घ्यावी असे शाहू महाराजांचे म्हणणे असल्याने व बाजीराव स्वामीनिष्ठ असल्याने निवडक सहकाऱ्यांसह निजामाच्या भेटीस गेला. दोघांची भेट बुधवार दि. २७ डिसेंबर १७३२ रोजी लातूरपासून ८ मैलांवर असलेल्या रोहे-रामेश्वर येथे झाली. भेट अगदी साधी झाली. निजामाने बाजीरावास ७ वस्त्रे, दोन सुंदर मोत्यांचे जोड, दोन घोडे व एक हत्ती नजर दिले. भेट चांगली पार पडल्याबद्दल महाराष्ट्रात सगळीकडे आनंद झाला. तोफांचे बार उडविण्यात आले. शाहू महाराजांनी साखऱ्या वाटल्या.[११]

या भेटीबद्दल एलफिन्स्टन म्हणतो, ''बाजीराव पेशव्यांच्याबरोबर ही जी निजामाची भेट झाली त्यात गुप्तपणे मराठ्यांनी निजामास असे आश्वासन दिले असावे की, आम्ही दक्षिणेत धामधूम करणार नाही. फक्त सरदेशमुखी व चौथा वसूल करु आणि निजामाने कबूल केले असावे की, उत्तर हिंदुस्थानात मराठे ज्यावेळी चढाई करतील त्यावेळी आपण गप्प बसू. मात्र मराठ्यांनी खानदेशला उपसर्ग पोचविता कामा नये.''[१२]

## भोपाळ लढाई -

बाजीरावाने उत्तरेकडील मोहीम हाती घेऊन माळवा व गुजराथ जिंकून घेतला. एवढेच नव्हे तर त्याने दिल्लीपर्यंत धडक मारली. तेव्हा बाजीराव व मराठ्यांना प्रतिकार करणारा बलाढ्य सेनानी दरबारात नसल्याने बादशहाने निजामाला दक्षिणेतून तातडीने बोलाविले. जुलै, १७३७ मध्ये निजाम दिल्लीत पोहोचला.[१३] राजधानीत त्याचे भव्य स्वागत झाले. मोगल दरबारातील सर्व श्रेष्ठ उमराव म्हणून त्याचा गौरव करुन बादशहाने त्याचा आसफजहाँ ही पदवी दिली.[१४] मराठ्यांना हाकून लावण्यासाठी बादशहाने त्याला एक कोटी रुपये व पाच सुभ्यांचा कारभार दिला. निजामपुत्र गाजीउद्दीन याला आग्रा व माळवा यांची सुभेदारी दिली. निजामाने इटावा, काल्पी, बुंदेलखंडावरुन धामणी व सिरोंजमार्गे भोपाळ गाठले. व तेथील तळे आणि किल्ला यामध्ये छावणी केली. आपला पुत्र नसिरजंग याला त्याने बाजीरावास दक्षिणेतून येताना माळव्यात अडविण्यास सांगितले. पण नाजिरजंगाला पुरेसा वेळ मिळाला नाही. शिवाय त्याच्या सैन्यातील काही मराठे फुटून बाजीरावाला मिळाले. दामाडे व रघुजी भोसले हे जरी तटस्थ राहिले असले तरी बाजीराव ८० हजार सैन्य जमा करु शकला. नर्मदा ओलांडून बाजीराव भोपाळ येथे पोहोचला. निजामाने संरक्षित जागा निवडली होती. पण ही बंदिस्त जागाच त्याच्या नाशास कारण ठरली. मराठ्यांनी निजामाची रसद बंद केली.

मोंगलांचे शिपाई व मराठे यांची चकमक झाली, पण निजामाने आपले शिपाई मागे घेतले. बाहेर पडून हल्ला करण्यासही त्याने सैन्यास मनाई केली. त्यामुळे निजामाचे सैन्य कंटाळले. मराठ्यांनी त्याला पुरते वेढले. सफदरजंगाने निजामाला मदत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. पण मल्हाररावाने त्याचा पराभव केला. अखेरीस निजाम मराठ्यांना शरण आला. ७-१-१७३८ रोजी बाजीराव-निजाम यांच्यात दुराई सराईचा तह झाला. त्यानुसार बाजीरावाला

सर्व माळवा निजामाने दिला. शिवाय नर्मदा व चंबळ यामधील प्रदेशही बाजीरावाला मिळाला. २) लढाईच्या खर्चाबद्दल बादशहाकडून ५० लाख रुपये देण्याचे निजामाने कबूल केले.

**भोपाळ विजयाचे महत्व :-**

भोपाळ लढाईनंतर यशवंतराव पवाराने कोट्यातून १० लाख रुपये मिळविले. शिंदे, होळकर, भावजी कवळे यांना बाजीरावाने प्रत्येकी २५ हजार रुपये बक्षीस दिले.[१५] पालखेड व भोपाळ युध्दामुळे बाजीरावाची किर्ती हिंदुस्थानभर झाली. भोपाळ विजय बाजीरावाच्या कर्तृत्वाचा परमोच्च बिंदू म्हटला पाहिजे. पण त्याचबरोबर निजामासारख्या कपटी माणसास बाजीराव सातत्याने मोकळा सोडतो हे अयोग्यच होते. अर्थात येथे शाहू बाजीरावापेक्षा जास्त जबाबदार ठरतो हे मागे एका शाहूच्या पत्रावरुन स्पष्ट केले आहे.

भोपाळ लढ्यात निजामाचा पराभव करुन लष्करी क्षेत्रातील मराठ्यांचे श्रेष्ठ त्व बाजीरावाने सिध्द केले. आणि एका नव्या साम्राज्याचा पाया घातला असेच म्हटले पाहिजे.

**शिंदे – होळकरांचे उत्तरेतील पराक्रम –**

बाजीरावाच्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या उत्तरेकडील पराक्रमाला उधाण आले. १७३१ च्या १४ डिसेंबर ला छत्रसाल मरण पावल्यावर त्याच्या राज्याचा तिसरा हिस्सा त्याने बाजीराव पेशव्यास दिला. पेशव्यांना मदत करण्याचे छत्रसालचे ब्रीद होतेच. छत्रसाल लिहितो, स्वामी ज्या मुलुखावर चालतील त्या मुलुखावर समागमे चालावे जो मुलुख जप्त करावा त्यात अर्धी अर्ध प्रमाण घ्यावे.[१६]

वरील धोरणानुसार चिमाजी अप्पा १७३३ च्या एप्रिल पर्यत बुंदेलखंडात होता. त्याने छत्रसालच्या राज्या लगत असलेल्या जतिया, ओडसा, नरवर, या संस्थानिकांकडून खंडण्या वसूल केल्या व आपले सैन्य ग्वाल्हेरपर्यत नेऊन ठेवले.

दरम्यान या काळात मराठे उत्तरेकडे गेले की, लोक त्यांना प्रदेश देऊन टाकत याबद्दलचे एक अप्रकाशित पत्र बोलके आहे. पत्र म्हणते की, विसी लाखाचा मुलुख बुधलियाने दिल्हा, परंतु बंदोबस्त झाला पाहिजे.[१७]

मराठ्यांना अशाप्रकारे माळवा, बुंदेलखंडात प्रदेश प्राप्ती होत होती. त्यांचा राज्यविस्तार होत होता. पण त्याचवेळी मिळालेल्या प्रदेश प्राप्तीचा मी एक वाटेकरी अशी त्यावेळी त्या भागात असलेल्यांची भावना होती. माळव्यात शिंदे, होळकर, पवार या तिघांना वाटा हवा असे. तो जर मिळाला नाही तर अडचणी निर्माण होतील असे कृष्णाजी हरी चिमाजी अप्पास लिहितो.[१८] अर्थात वतनाची अभिलाषा हे मराठी मनाचे वैशिष्ट्यच होते. त्यानुसार वरील वर्तन झाले. तथापी आपल्या पराक्रमामुळे आपल्याला काहीतरी प्राप्त होणार आहे म्हणून का होईना मराठ्यांनी आपला साम्राज्य विस्तार केला हे नाकारता येणार नाही.

१७३३ नंतर बाजीरावाने उत्तरेकडे लक्ष केंद्रीत केले. उत्तरेत फौजा गेल्याशिवाय खंडण्या वसूल होणार नाहीत हे ठाऊक असल्यामुळे त्यांनी पिलाजी जाधवाला डिसेंबर १७३३ मध्ये उत्तरेकडे रवाना केले.[१९] शिंदे, होळकरही खानदेश ओलांडून माळव्यात गेले.[२०] या सर्वांच्या फौजांनी उत्तरेकडची गावेची गावे उध्वस्त करुन

खंडण्या वसूल केल्या त्यांना प्रतिकार झालाच नाही. ग्वाल्हेर ते अजमेर १५० ते २०० मैलांचा टापू मराठ्यांनी पादाक्रांत केला.[२१]

## बादशाही सैन्याची मराठ्यांवर चढाई -

सन १७३४ च्या दिवाळीत मराठी फौजा उत्तरेत फिरु लागल्या, त्यास प्रतिकार करण्यासाठी बादशहाने आपला वजीर, कमरुद्दीनखान व मीरबक्षीखान डौरान ह्यांना सैन्यासह मराठ्यांवर चालून जाण्याची आज्ञा केली. हे दोन उमराव भली मोठी फौज घेऊन मराठ्यांवर घसरले. मराठ्यांच्या वायुगती घोडदौडीपुढे मोगलांचा तोफखाना निरपयोगी ठरला. कमरुद्दीनच्या फौजेने मराठ्यांच्या फौजेशी दोन-तीनदा झुंज दिली. कमरुद्दीनला अपयश आले. पण मराठ्यांनाही काही लाभ झाला नाही. जून १७३५ च्या सुमारास मराठी फौज दक्षिणेस आली.[२२]

## खान डौरानवर विजय -

शिंदे होळकरांनी आपली जरब मोगलास दाखविण्याकरिता १७३४ चा पावसाळा संपताचा बुंदी, कोटा अहिरगड या मुलखात झपाट्याने खंडण्या घेण्याची सुरुवात केली. त्यांना धाक दाखविण्याकरिता मीरबक्षीखान डौरान बाहेर पडला. त्याने मारवाडातील सर्वराजे रजवाड्यांना सामील करुन घेतले. समोरासमोरची लढाई मराठ्यांनी टाळली. शिंदे-होळकर मुकुंददरा नदी पार झाले. खान डौरानला मिळालेले लोक त्यास सोडून जाऊ लागले. तेव्हा खान डौरानने शिंदे होळकरांशी तह केला.[२३] शिंदे-होळकर या आपल्या सरदारांनी मोगलास खडे चारल्याचे पाहून बाजीरावाने उभयतांचे कौतुक केले.[२४]

## तडजोडीचे प्रयत्न -

मराठ्यांशी केलेल्या मानहानाची तहामुळे खानडौरानवर बादशहाची इतराजी झाली. खानडौरान बादशहाच्या मनातून उतरावा हा एकच हेतू मनाशी बाळगून दरबारातील इतर मुसद्दी कमरुद्दीनखान, सादतखान वगैरेनी खान डौरानच्या फंद फितुरीची शंका व्यक्त केली. जयसिंगाचीही त्यांनी बादशहापाशी नालस्ती केली.

मराठ्यांचा बंदोबस्त कसा करावा याचा विचार करण्यासाठी बादशहाने दरबार भरविला असता जयसिंगाने भर दरबारात स्पष्टपणे सांगितले की, ''औरंगजेबसारख्या बलाढ्य बादशहाकडून मराठ्यास आळा बसू शकला नाही, औरंगजेबानंतर मराठ्यांचे बल अतोनात वाढून पश्चिम हिंदुस्थानातील बहुतेक प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात गेले आहेत. त्यांची शक्ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांना आळा घालण्याची ताकद एकाही उमरावाची नाही. शाहू छत्रपती, पेशवे व सरदार यांची पूर्ण जानपछान असून त्यांचे हेतू बादशहाची सेवा करण्याचे आहेत. बादशाहीस दगा करावा किंवा त्यास नेस्तनाबुद करावे अशी एकाचीही ईच्छा नाही. त्यांचे म्हणणे असे की, ''आमच्या पोटापाण्याची सोय करा आम्ही फौजा बाळगून

शत्रूंचे निवारण करु . अकबर बादशहाचे धोरण स्वीकारुन पेशव्यास भेटीस बोलवावे व त्याजवर असल्या संरक्षणाचा भार टाकावा. ही जबाबदारी अंगावर पडली की त्यांची बंडखोरी थांबेल. हे सर्व घडवून आणण्याची जबाबदारी आम्ही आमच्यावर घेतो. अन्य उपाय नाही. '' तेव्हा जयसिंग समानधर्मी मराठ्यांस सामील होऊन विश्वासघात करतात सबब त्याचकडील सुभेदारी काढून घ्यावी असे मत कमरुद्दीनने दिले. त्याज निजामाने आपला पाठींबा कळविला. सादतखानही त्यांच्यात सामील झाला. एवढेच नव्हे तर निजामाच्या मदतीने मराठ्यांचा बंदोबस्त करतो असे म्हणू लागला.

अशा परिस्थितीत पेशव्याने १७३५ मध्ये शिंदे-होळकर, बाजी भीमराव यांच्यासह उत्तरेकडे कूच केले. ज्यांच्या सरदारांनी मोगली सैन्याची वाताहात केली ते पेशवेच स्वत: स्वारीवर निघाले हे ऐकून उत्तरेतील संस्थानिकांचा थरकाप उडाला. निजामाच्या दरबारातही खळबळ उडाली. बादशाही फौजेच्या मदतीस जाण्यासाठी आपल्या फौजेची व तोफखान्याची निजामाने जल्दी केली. [२५] तथापी पेशव्यांच्या अथवा मराठ्यांच्या सैन्यावर त्याचा काहीएक परिणाम झाला नाही.

## बाजीराव उदेपूर राणा भेट –

पेशवे अनेक खंडण्या घेत कुकसी फत्ते करुन लुनावडा, बासवाडा, डोंगरपूर आदी राजपूतान्यातील अनेक राजेरजवाड्यांकडून सत्कार स्वीकारीत उदेपूर राज्याच्या भेटीस गेले. [२६] चंपाबागेत राण्याने बाजीरावाच्या भेटीसाठी खास शामीयाना उभारला. पेशव्याने जाऊन राणाजीची भेट घेतली. राण्याने पेशव्यांच्या खंडणीच्या मागण्या मान्य केल्या पेशव्यास ३ ते ७-२-१७३६ पर्यंत ठेऊन घेतले. [२७]

## खान डौरानकडून बाजीरावाचा सत्कार –

बादशहाची सारी भिस्त खानावर होती. पण अखेर बादशहाने खान डौरानच्या पेशव्यांशी समेट करण्याच्या धोरणास मान्यता दिली. खान डौरानने ही हकिगत जयसिंगास कळविली व तेव्हा जयसिंगाने पेशव्यांकडे नजराणा पाठवून त्यास आपल्या भेटीस बोलाविले. खान डौरानने सतत दोन महिने वेळोवेळी नजराण्यादाखल निरनिराळ्या रकमा बाजीरावास पाठवून दिल्या. खान डौरान हा बादशहाचा प्रतिनिधी होता. अर्थात बादशहाच बाजीरावाच सत्कार करीत होता. [२८]

## बाजीराव – जयसिंह भेट –

बाजीरावाने उदेपूरचा पाहुणचार घेऊन नाथद्वारास जाऊन पत्नीसमवेत देवदर्शन घेतले. ता. ४-३-१७३६ रोजी बाजीराव व जयसिंग यांची भेट किशनगड नजीक बंभोला येथे झाली. [२९] बाजीरावास जयसिंहाने पाच लाख

खंडणी सालोसाल दिल्याचे कबूल केले. तसेच पूर्वी ठरलेली वीस लाख हप्त्यांनी व जागीर देण्याचा ठराव झाला. अशा परिस्थितीत लवकरच बाजीराव बादशहा भेट होणार अशी वार्ता सर्वत्र पसरली. दक्षिणेतून निजामाने बादशहास कळविले की, तुम्ही बाजीरावाची भेट घ्याल तर घात होईल. बादशहाला प्रश्न पडला प्राप्त परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी त्याने माळव्याचा सुभा जयसिंगाकडे ठेऊन त्याचा नायब म्हणून बाजीरावाची नेमणूक केली. पेशव्याने शिंदे, होळकर पवार यांना माळव्यात ठेऊन मे १७३६ अखेर द.कूच केले.[३०]

## पेशव्यांची मातोश्री राधाबाईची काशीयात्रा –

मराठ्यांचा उत्तरेत जम बसू लागला. राजपुतान्यातील राजेरजवाडे बाजीराव पेशव्यास आपल्या बरोबरीने मान देऊ लागले. हे ऐकून पेशव्यांची मातोश्री राधाबाई यांनी आपली काशीयात्रेस जाण्याची मनिषा बाजीरावाकडे व्यक्त केली. पेशव्यांनी आपल्या मातोश्रींच्या उत्तरेकडील प्रवासाची तयारी केली. उत्तरेतील प्रवासाची कल्पना उत्तरेतील समस्त राजेरजवाड्यांना देण्यात आली. उत्तरेतील शिंदे होळकर बुंदेले यांना मातोश्रींचा प्रवास बिनधोक होण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यास सांगितले. पुण्यातून १४-२-१७३५ रोजी मातोश्रीबाई प्रवासास निघाल्या. त्या मार्च महिन्यात भराणपूरास पोहोचल्या. पुढे भराणपूरच्या मुसलमान सरदाराने मातोश्रींच्या संरक्षणाकरिता नर्मदा पार होईपर्यंत शे-दोनशे राऊत दिले.[३१] मे महिन्यात राधाबाई उदेपूरास गेल्या. तेथे त्यांचा बहुमान करण्यात आला. उदेपूराहून मंडळी जयपूरास आली. तोच बादशहाची दस्तके सुखरूप प्रवास होण्यासाठी आली. या प्रवासात रजपूतांनी एकूण खूपच आदरसत्कार करुन द्रव्यही दिले. जयपूरच्या साबाजींनी तर मातोश्रीस आपली आईच मानले.

१७-१०-१७३५ रोजी मातोश्रीबाई काशीस पोहोचल्या. मे १७३६ मध्ये त्या परत पुण्यास पोहोचल्या. १-६-१७३६ रोजी मातोश्रींच्या काशियात्रेचे प्रित्यर्थ मावंदे केले.

## पेशव्यांची दिल्लीवरील चढाई –

बाजीरावास तसेच शिंदे-होळकर सरदारांस पैशाची ओढग्रस्त लागली. स्वाऱ्या करुनही पैसा मिळत नाही याबद्दल बाजीराव पेशवे यांना विषाद वाटला. तेव्हा पावसाळ्यात सर्व जबाबदार मराठा सरदारांबरोबर वाटाघाटी करुन पेशव्यांनी दिल्लीवर चालून जाण्याचा पक्का विचार केला. मराठ्यांचा बंदोबस्त व्हावयास हवा या विचाराने बादशहाने पेशव्यांस पायबंद घालण्यासाठी सर्व सरदारांनी एक व्हावे असे आवाहन बादशहाने सर्व सरदारांस केले. निजामाने पेशव्यांस नर्मदा उतरु न द्यावे असे कळविले. ही बातमी बाजीरावाला समजली तेव्हा त्यांनी नोव्हेंबर १७३६ मध्ये पुणे सोडले. व निजामास चुकवून ते नर्मदा नदी पार झाले. शिंदे, पवार त्यांना मिळाले. १२-१-१७३७ रोजी त्यांनी भेलशास वेढा घातला.[३२] इथून पुढे मोघल सरदारांस व दिल्लीपतीच्या मांडलीकास जेरीस आणून त्यांचेकडून पैसा वसूल करणे असे दोन हेतू पेशव्यांनी ठेवले. राजधानीवर चालू जावून बादशहास दहशत बसविण्याचे स्वत:

पेशव्यांनी ठरविले. इतर सरदारांनीही कामगिऱ्या वाटून घेतल्या. गनिमी काव्याने शत्रूस हैराण करण्याचा हेतू पेशव्यांनी सरदारास दिला. बाजीराव बुंदेलखंडात शिरले. त्यांनी मुलूख काबीज केला. त्यानंतर अहेर व भदाव घेतले. अहेरचा राजा गोपाळसिंग शरण आला. सादतखानास त्याच्या या कृत्याचा राग आला. त्याने मराठ्यांवर चाल केली. काहींना पकडले. त्यामुळे सादतखानास वाटले की आपण मराठ्यांना बुडविले. त्याने तसे बादशहास कळविलेही.[३३] बाजीरावास सादतखानाच्या या थापा बादशहास दाखवावे असे वाटले. म्हणून त्यांनी दिल्लीवर चाल केली.

## बाजीरावाचा दिल्लीस मुक्काम –

दिलीच्या दक्षिणेस ३ मैलावर बाजीरावाने मुक्काम केला. बादशहांस आपला पुढील बेत कळविला. बाजीरावावर हल्ला करण्यासाठी बादशहाने अमीरखानास १२००० स्वार, २०००० पायदळ व तोफखाना देवून पाठविले. शहरात सर्वत्र सावधान असावे अशीही ताकीद देण्यात आली.

मोघल फौजेने मराठ्यांवर चाल केली. बाजीराव पेशव्यांनी भाल्यासारखे मागे सरुन मोघलांस पूर्णपणे अंगावर घेतले. मुघल पकडीत आलेले दिसताच सेखोजी जाधव, मल्हारराव व राणोजी यांनी चवताळून जावून मोघलांस हातोहात तलवारीने कापून काढले. काही जीव घेवून परत गेले. जखमी झाले. त्यांच्या झुंडी शहरात शिरल्यावर शहरवासियांची बोबडीच वळली. बाजीरावाने शहर न लुटता दिल्लीकरांना धाक दाखवून ते परत फिरले. शाहूने त्यांची प्रशंसा केली. तर चिमाजीने त्यांचे अभिनंदन केले.[३४]

## नादीरशाहाची स्वारी –

नादीरशहाने इराणहून स्वारी करुन १७३८ सालीच काबूल जिंकले. सरहद्दीवरील रानटी टोळ्यांचा बंदोबस्त करण्याची त्याने तेथून हिंदूस्थानच्या बादशहाला तंबी दिली. पण बादशहाने त्याकडे दुर्लक्ष केले. तेव्हा लगेच शहाने पेशावर व अटक घेवून लाहोरवर स्वारी केली. शहाच्या स्वारीचा बंदोबस्त करण्यासाठी बादशहा प्रचंड सैन्य घेवून निघाला.[३५] सोबत खान दुराण, सादतखान, निजाम, यांच्यासारखे उमराव होते. प्रचंड सैन्य व शूर सरदार असूनसुध्दा बादशहाशी निष्ठा व ऐक्य यांचा अभाव असल्याने शहाशी लढताना मुघलांचा पराभव झाला. मुघलांचे ३०००० शिपाई कापले गेले व अनेक मोठे सरदार मारले गेले. दिल्लीचे तख्त काबीज करुन त्याने स्वत:स हिंदूस्थानचा बादशहा म्हणून घोषीत केले. शहाने दिल्लीच्या प्रजेवर भयानक अत्याचार सुरु केले. मोठमोठ्या धनिकांचे हाल करुन पैसे उकळण्यात आले. वजीर कमरुद्दीनला उन्हात उभे करुन एक कोट नक्त व शिवाय हत्ती, जवाहीर वगैरे त्याजकडून घेण्यात आले. परत जाताना त्याने एक अब्ज किंमतीची संपत्ती, ३०० गवंडी, २०० लोहार, २०० सुतार, १०० पाथरवट व १३० हिशेबनीस नेले.

खरे म्हणजे सादतखान व निजाम यांनीच स्वामीद्रोह करुन नादीरशहाची स्वारी करविली होती. मोघली सत्ता

मराठी सत्तेच्या घशातून वाचविण्याचा हा एकमेव मार्ग म्हणून त्यांनी शहाला गुप्त सहाय्य केले होते. परंतू शहा दिल्लीत फार काळ राहिला नाही. तसेच मराठ्यांशर संघर्ष करुन हिंदुस्थानचे साम्राज्य घेण्याचा त्याचा इरादाही नव्हता. त्याच्या स्वारीमुळे मोघल बादशाही अधिकच खिळखिळी झाली. सर्व उत्तर हिंदुस्थानभर अराजक माजले. ते मोडून काढण्याची शक्ती मोघलांत राहिली नाही आणि सर्व हिंदुस्थानभर साम्राज्य पसरविण्याच्या मराठ्यांच्या जिद्दीला एक आव्हान मिळाले. सर्व हिंदूस्थानातील सत्ताधिशांची नजर बाजीरावाकडे वळली. हा एकच पुरुष हिंदुस्थानातील अराजक मोडून सुव्यवस्था व शांतता निर्माण करु शकेल असा विश्वास सर्वांना वाटत होता.

दिल्लीच्या बादशहाला तख्तावरुन दूर करुन शाहूला सर्व हिंदुस्थानचा हिंदुसम्राट करण्याचे बाजीराव व इतर सेनानींना अशक्य नव्हते. परंतु मोगल बादशहाच्या अडचणीच्या प्रसंगी सहाय्यास जाईन हा शब्द शाहूने औरंगजेबला दिलेला असल्याने मोगल बादशाहीची भव्य इमारत नष्ट करणे शाहूच्या मनात नव्हते. हेच खरे.

शाहूने बादशहाला शहाच्या विरोधी मदत करण्यासाठी बाजीरावाला पाठविले. पण बाजीराव बऱ्हाणपूर जवळ आला तोच त्याला समजले, नादीरशहा इराणला गेला. तेव्हा पेशवा बाजीराव बुऱ्हाणपूर पलीकडे न जाता पुण्याकडे फिरला व २७-७-१७३९ रोजी पुण्यास पोहचला.

या स्वारीच्या परीणामांबद्दल डॉ.दिघे लिहितात. १७३९ नंतर अवघ्या वीस वर्षात मराठ्यांची सत्ता झपाट्याने हिंदुस्थानात फैलावली. बादशाही आता क्षीण झाली असून मराठ्यांना प्रतिकार करण्याची ताकद तिच्यात उरली नव्हती पुढील वीस वर्षात मराठे व्यावहारिक दृष्टीने संपूर्ण भारताचे मालक बनले.[३६]

बाजीराव पेशव्याने वरील उत्तरेकडच्या स्वाऱ्या करुन, दिल्लीपर्यत धडक मारुन मराठ्यांचा फार मोठा साम्राज्य विस्तार साधला यात दुमत नाही. पण त्याचबरोबर त्याने दक्षिणेवरही दोन स्वाऱ्या केल्या होत्या. अर्थात उत्तरेच्या मानाने त्याचा दक्षिणेकडील साम्राज्य विस्तार नगण्यच म्हटला पाहिजे. त्याने जरी दोनच स्वारी दक्षिणेवर केल्या असल्या तरी त्याची दखल घ्यायलाच हवी. तथापी शहाजी ते बाजीराव काळात कर्नाटकात मराठ्यांनी काय उद्योग केले याची चर्चा पाचव्या प्रकरणात करावयाची आहे.

मात्र साम्राज्य विस्ताराच्यादृष्टीने विचार करता येवढे मात्र निश्चित की, मराठ्यांचा नक्ष त्या बाजूस राहण्यास या स्वाऱ्यांचा चांगला उपयोग झाला असावा असे जे खरे यांनी म्हटले ते मान्य करण्यास हरकत नसावी.[३७]

बाजीराव पेशव्याने पंतप्रधान या नात्याने मराठा साम्राज्य विस्ताराचा फार मोठा उद्योग आरंभला व तो तडीस नेला. त्याच्या या कामात त्याला त्याचा धाकटा भाऊ चिमाजी आप्पा ह्याने खूप मोठी मदत केली. तथापी चिमाजीच्या वसई मोहिमेच्या व्यतिरिक्त फारसे इतरत्र लिहीले गेले नाही. परंतु चिमाजी आप्पा थोरल्या बाजीरावापेक्षा श्रेष्ठ, शूर, धोरणी, मनमिळाऊ होता. वसईच्या युध्दात सापडलेली फिरंग्यांची मुलगी त्याने सन्मानाने परत पाठविली.[३८]

वसईच्याच मोहिमेत कामाला आलेल्या लुई न्हेलेझोच्या बायकोने चिमाजीजवळ नवऱ्याचे प्रेत पुरण्याची परवानगी मागितली ती त्याने दिलदारपणे मान्य केली. ह्या त्याच्या औदार्याची पोर्तुगीज इतिहासकारांनी मुक्त कंठाने स्तुती

केलेली आढळते.[३९]

बाजीरावाने काढलेल्या गुजराथ, माळवा, बुंदेलखंड इ. स्वाऱ्यांच्या वेळी चिमाजी आप्पाने फार मोठी कामगिरी बजावली. परंतु या शोध प्रबंधाच्या पुढील प्रकरण क्रमांक चार मध्ये वरील तीनही भागातील हालचालींचाच समावेश असल्याने त्या त्या ठिकाणीच आप्पाच्या कामगिरीची माहिती देणी युक्त होईल. एक मात्र निश्चित की चिमाजीने जिथे जिथे पाय ठेवला तेथे आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. गुजराथमध्ये त्याने केलेल्या कामगिरीमुळेच गुजराथी लोक त्याला सन्मानाने चिमणराज असे म्हणू लागले.[४०] चिमाजी आप्पाबद्दल तो बाजीरावपेक्षाही सरस असल्याची कबुली सरदेसायांनी दिलेली आढळते.[४१] शाहू आणि सरदारही काही वेळेस चिमाजीच्या तंत्राने कारभार करीत असत. थोडक्यात काय तर बाजीरावाच्या मराठा साम्राज्य विस्ताराच्या कामगिरीत चिमाजी आप्पाचाही निश्चित मोठा वाटा आहे. बाजीरावाच्या मृत्युनंतरही मराठा साम्राज्य विस्ताराचे कार्य कमी होता कामा नये किंवा उत्तरेकडे दुर्लक्ष होता कामा नये म्हणून तो स्वतः नानासाहेबासह उत्तरेत निघाला. परंतु अल्पावधीच त्याची प्रकृती नादुरुस्त झाल्याने त्याला पुण्याकडे परतावे लागले. पुण्यातच १७ डिसेंबर १७४० रोजी तो मृत्यू पावला.[४२]

### *पेशवे बाजीराव आणि पश्चिम किनारा -*

#### कोकणची राजकीय स्थिती –

उत्तर हिंदूस्थानात बाजीरावाला झपाट्याने यश मिळत गेले परंतु तसे यश त्याला कोकणात मात्र मिळाले नाही. पश्चिम किनाऱ्यावरील त्याच्या प्रगतीचा वेग अतिशय मंद होता. शिवाजी महाराजांपासूनच कोकणची समस्या त्रासदायक बनली होती. या पश्चिम किनाऱ्यावर जंजिऱ्याला सिद्दी, गोव्याला पोर्तुगीज आणि मुंबईला इंग्लीश या विदेशी सत्तांची ठाणी असल्यामुळे कोकणचा प्रश्न अधिकाधिक गुंतागुंतीचा बनला होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युध्दाचा फायदा घेवून सिध्दी अधिकच सामर्थ्यवान बनला होता. औरंगजेबाच्या कारकीर्दीत मोंगलांना मदत केल्यामुळे औरंगजेबाने रायगड, अंजनवेल आणि सिंधुदुर्ग हे लष्करीदृष्ट्या महत्वाचे किल्ले सिध्दीला देवून टाकले होते. सिद्दीप्रमाणेच पोर्तुगीजही सामर्थ्यवान बनले होते. साष्टी, वसई यासारख्या महत्वाच्या ठिकाणांवर त्यांचा ताबा होता. इंग्रजांना मात्र मुंबई बेटाचा कसाबसा ताबा मिळाला होता. आणि त्यांना फक्त व्यापारात विशेष रस वाटत होता. आपल्या व्यापाराला धक्का लागू नये म्हणून मराठ्यांशी शत्रुत्व घेण्याची त्यांची तयारी नव्हती. याच काळात कान्होजी आंग्रे याचा उदय झाल्यामुळे सिद्दीला थोडाबहुत पायबंद बसला होता. कान्होजी कर्तबगार असल्यामुळे त्याचा सर्व सत्तांशी संघर्ष निर्माण झाला. इतकेच नव्हे तर कोल्हापूरचा संभाजी आणि वाडीचा सावंत यांच्याशीही त्याचे सतत भांडण चालू होते. अशारितीने पश्चिम किनाऱ्यावर सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज, आंग्रे, सावंत आणि संभाजी यांच्यात सतत संघर्ष निर्माण झाल्यामुळे कोकणची भूमी ही युध्दभूमी बनली होती. बाळाजी विश्वनाथाने ही सर्व परिस्थिती पाहूनच कान्होजी आंग्र्याला आपल्या बाजूने वळवून घेतले होते आणि त्याचबरोबर सिद्दीशीही समेट घडवून आणला होता. त्यामुळे कोकणात

विदेशी सत्तांचे उच्चाटन करणे एवढेच ध्येय कान्होजी समोर उभे राहिले. त्यादृष्टीने कान्होजीने तयारी चालविली. सिद्दीशी दीर्घकालीन लढा दिल्यामुळे त्याचे सामर्थ्य बरेच कमी झाले होते. त्यामुळे लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान होण्याचा त्याने प्रयत्न चालविला. यावेळी रायगडचा किल्ला सिद्दीच्या ताब्यात होता. मराठ्यांच्या दृष्टीने प्रतिष्ठेला हानी आणणारी ही गोष्ट होती. रायगड हा मराठ्यांचा मानबिंदू होता. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक येथेच झाला होता. असा हा किल्ला सिद्दीच्या ताब्यात असावा याची खंत मराठ्यांना वाटत होती. सिद्दीने रायगडाबरोबरच कोकणचेही काही प्रदेश गिळंकृत केले होते. ते प्रदेश परत मिळविण्याकरिता मराठे आणि कान्होजी हे दोघेही आता सिध्द झाले होते. कान्होजी आणि सिद्दी यांच्यात तात्पुरती मैत्री करुन दिल्यानंतर बाळाजी विश्वनाथाला पांच वर्षापर्यंत कोकणाकडे लक्ष द्यायला अजिबात सवड सापडली नाही. कोकणच्या बंदोबस्ताची सर्व व्यवस्था त्याने कान्होजीकडेच सोपविली होती. ज्यावेळी बाजीराव पेशवा बनला त्यावेळी बराचसा कोकणचा भाग हा परकीय सत्तांच्या ताब्यात गेला आहे असे त्याला दिसून आले. बराचसा प्रदेश मराठा सरदारांच्या ताब्यात होता आणि बाजीरावाला विरोध करणाऱ्या श्रीपतराव प्रतिनिधीनेही कोकणच्या काही प्रदेशावर ताबा मिळविला होता. १७३१ पर्यंत बाजीरावाला कोकणकडे लक्ष देण्यास सवड सापडली नाही. या काळात सिद्दी दिवसेंदिवस जास्त उपद्रवकारी होत गेला. हिंदूवरील त्याचे अत्याचार वाढत गेले. निजामाच्या चिथावणीवरुन पालखेड समोवतालचा मुलूख त्याने लुटून घेतला.[४३] आंग्र्यांच्या ताब्यातील कोकणच्या प्रदेशात लुटालूट केली. अशा स्थितीत सिद्दीचा बंदोबस्त करणे मराठ्यांना आवश्यक झाले होते. म्हणून कान्होजी आंग्रे याने कोकणात सिद्दीविरुध्द युध्द पुकारले. परंतु कान्होजीला एकट्याने लढणे अशक्य होऊन बसले. त्याने शाहूला मदत पाठविण्याची विनंती केली.[४४] बाजीराव कर्नाटकच्या युध्दात गुंतला असल्यामुळे त्याला कोकणात जाणे शक्य झाले नाही. यावेळी सिद्दीने कोकणातील परशुरामाच्या मंदिरावर हल्ला चढवून ते उध्वस्त केले.[४५] सिद्दीच्या या अत्याचारामुळे कोकणात फार मोठा असंतोष निर्माण झाला. हिंदूची मने त्यामुळे दुखावली गेली. ब्रम्हेंद्रस्वमींचा या देवालयाशी निकटचा संबंध होता. सिद्दीचे अत्याचार त्याला पहावले नाहीत. ते कोकण सोडून देशावर रहायला आले आणि त्यानेच शाहू आणि बाजीरावाला सिद्दीच्या बंदोबस्ताची विनंती केली.

**<u>ब्रह्मेंद्रस्वामी चरित्र आणि व्यक्तीमत्व –</u>**

वऱ्हाडातील दुधेवाडी खेड्यात एका गरीब कुटुंबात स्वामीजींचा जन्म झाला. लहानपणापासूनच ईश्वरभक्तीकडे स्वामीजींचा ओढा होता. गणपती हे त्यांचे अराध्य दैवत होते. वयाच्या चौदाव्या वर्षी काशीला जाऊन त्यांनी संन्यास घेतला. त्यामुळे ते ब्रह्मेंद्रस्वामी म्हणून ओळखले जाऊ लागले. देशभर भ्रमण करीत असताना ते कोकणात आले. आणि तेथेच त्यांनी मुक्काम केला. चिपळूणजवळील परशुरामाच्या मंदिरात त्यांनी आपला मुक्काम ठेवला. अल्पावधीतच त्यांची किर्ती सर्वत्र पसरली. लवकरच त्यांचा बाळाजी विश्वनाथाशी संबंध आला आणि शाहू आणि बाळाजी त्याला आपले गुरु समजू लागले. चिपळूण जवळच स्वामींनी एक मोठे देवालय बांधले. तेच आजचे परशुराम मंदीर होय.

कोकणातील सर्व सत्तांना स्वामींबद्दल अतिशय आदर होता. जंजिऱ्याचा सिद्दीसुध्दा त्याला अपवाद नव्हता. अंजनवेलचा सुभेदार सिद्दीसात याला मात्र स्वामींबद्दल प्रेम नव्हते. त्याने १७२७ मध्ये मंदीर उध्वस्त करुन टाकले.[४६] सिद्दीच्या या कृत्यामुळे सर्व महाराष्ट्र खवळून उठला. सिद्दीचा याकरिता सूड घेतलाच पाहिजे अशी भावना सर्वत्र झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून सिद्दीने दिलगिरी व्यक्त केली परंतु त्याचा विशेष उपयोग झाला नाही. ब्रह्मेंद्रस्वामीने यानंतर कोकण सोडून साताऱ्याजवळ धावडशी येथे मुक्काम करुन राहिला.[४७] त्याच्या विनंतीवरुनच मराठ्यांनी सिद्दीशी युध्द करण्याचे ठरविले.

## मराठे आणि सिद्दी यांच्यातील युध्द –

कोकणात कान्होजी आणि सिद्दी यांच्यातील संघर्षाला आधीच प्रारंभ झाला होता. १७२७ मध्ये कर्नाटकावरील मोहीम संपुष्टात आली आणि मराठे कान्होजीला कोकणात मदत देण्यास मोकळे झाले. प्रथमतः या मोहीमेवर प्रतिनिधी आणि पिलाजी जाधव यांची नेमणूक करण्यात आली.[४८] पिलाजीने पोर्तुगीजांना अडवून धरावे आणि सिद्दीला पोर्तुगीजांची कोणतीही मदत मिळू नये असे ठरले. प्रतिनिधी आणि पिलाजी हे दोघेही बाजीरावाचे विरोधक असल्यामुळे त्यांना बाजीरावाने जाणूनबुजून कोकणच्या स्वारीवर पाठविले असे सुध्दा सांगितले जाते. तसे असेल तर बाजीरावाचा हेतू बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला असे म्हटले पाहिजे. कारण प्रतिनिधीला कोकणात विशेष यश मिळविता आले नाही.[४९] तर बाजीरावाला मात्र निजामाविरुध्द मोठा विजय मिळून त्याला मुंगी-शेगावचा तह करणे भाग पडले होते. या सर्व पराक्रमात खरा पराक्रमी कोण, ही गोष्ट स्पष्ट झाली. शेवटी १७३० मध्ये प्रतिनिधींना कोकणातून परत बोलाविण्यात आले. इ.स.१७३०-३१ मध्ये कान्होजी आंग्र्यांच्या दोन मुलांमध्ये म्हणजे सेकोजी आणि संभाजी यांच्यात यादवी निर्माण झाली. त्यामुळे आंग्रे दुर्बळ होत जाऊन पेशवे मात्र बलीष्ठ होत गेले. परंतु त्याचबरोबर कोकणातील स्वारी मंदावली आणि तिचा फायदा सिद्दीला झाला. कान्होजी आंग्रेच्या मृत्यूनंतर कोकणात सिद्दी बलीष्ठ होत गेला. अनेक कारणांमुळे बाजीरावाला कोकणकडे लक्ष द्यायला सवड सापडली नव्हती. परंतू आता १७३२ मध्ये डभईच्या विजयानंतर बाजीराव बऱ्याच प्रमाणात मोकळा झाला आणि त्याने कोकणचा प्रश्न तडीस लावण्याचे ठरविले.

## मार्गातील अडथळे –

कोकणच्या प्रश्नात बाजीरावाला अनेक अडचणी आढळून आल्या. संपूर्ण कोकणचा प्रदेश विदेशी शासकांनीच जणू आपापसांत वाटून घेतला होता. या सर्वांमध्ये सिद्दी आणि पोर्तुगीज जास्त प्रभावशाली होते. या सर्वांना नामोहरम करण्याचे कार्य इ.स.१७३३-३९ या काळात बाजीरावाने केले.

१७३२ मध्ये शाहूने प्रथमतः श्रीपतराव प्रतिनिधीची कोकणच्या स्वारीवर नेमणूक केली. प्रतिनिधीने सर्वप्रथम

अंजनवेलला वेढा दिला.[४९] सिद्दीने छ.शाहूची प्रत्यक्ष भेट घेवून तहाच्या वाटाघाटी कराव्यात आणि जे काही मतभेद असतील ते विचारविनिमयाने मिटवून टाकावेत परंतू शक्यतोवर बाजीरावाची मध्यस्ती स्वीकारु नये असे प्रतिनिधीचे मत होते. प्रतिनिधी आणि बाजीराव यांचे संबंध चांगले नसल्यामुळे सिद्दीनेच ही मसलत प्रतिनिधीच्या डोक्यात भरविली होती. ही योजना शत्रूला सांगण्याची प्रतिनिधीची हिंमत नव्हती. म्हणून प्रतिनिधीने बंकाजी नाईकामार्फत वाटाघाटीचा प्रयत्न केला. परंतू बंकाजीने त्याला पूर्ण नकार दिला. सिद्दीची यामुळे फार मोठी निराशा झाली. वरकरणी प्रतिनिधीबाबत सिद्दी आतापर्यंत मित्रभाव दाखवत होता. तथापी आता मात्र त्याचा तो मित्रभाव विरुन गेला. हा एक प्रकारे प्रतिनिधीच्या मुत्सद्देगिरीचा पराभवच होता. या वार्ता शाहूच्या कानावर गेल्या. त्याने प्रतिनिधीला परत बोलाविले आणि कोकणच्या स्वारीचे नेतृत्व बाजीरावाकडे देण्यात आले.

**<u>बाजीरावाच्या कोकणातील हालचाली –</u>**

इ.स.१७३३ मध्ये सिद्द्यांचा प्रमुख नेता सिद्दी रसुल याकूब याचा मृत्यू झाला.[५०] या संधीचा फायदा घेण्याचे बाजीरावाने ठरविले. सिद्दी याकुबला अनेक मुले होती. त्यात अब्दुल्ला हा वडील मुलगा होता. गादीचा तोच खरा वारस होता. परंतु त्याला गादी मिळू नये अशी त्याच्या भावांनी खटपट चालविली होती. इतकेच नव्हे तर त्याच्या भावांनी त्याला विरोध चालविला होता. राज्यात सात सुभेदार होते. त्यांनाही अब्दुल्लाने राजा होणे पसंत नव्हते. या सर्व सुभेदारांत शेख याकुबखान नावाचा जो सुभेदार होतो तो अतिशय महत्वाकांक्षी होता. राज्यातील यादवी युध्दाचा त्याने फायदा घेण्याचे ठरविले. मराठ्यांचे सरदार यादवी युध्दात तेल ओतण्याचे कार्य करीत होते. यशवंतराव पोतनीस या मराठा सरदाराने सिद्दीच्या वारसांमध्ये भांडणे लावण्यात बरेच यश मिळविले. या भांडणात सिद्दी रहमानने मराठ्यांचा आश्रय घेतला. अशारितीने आपसांत भांडणे लावल्यामुळे सिद्दी शासकांची परिस्थिती दुर्बळ बनून गेली. हीच परिस्थिती आपल्याला अनुकूल आहे याचा विचार करुन शाहूने बाजीरावाची सिद्दीच्या स्वारीवर नेमणूक केली. १७३३ च्या एप्रिल महिन्यात बाजीराव आणि फत्तेसिंग हे दोघेही कोकणात येवून पोहोचले.[५१] आल्याबरोबर बाजीरावाने तळे आणि घोसाला हे दोन किल्ले जिंकले. दंडराजपूरी या ठिकाणी एका चकमकीत सिद्दीचा पराभव झाला. म्हणून सर्व सिद्दी राजपुत्र जंजिऱ्याच्या किल्ल्यात आश्रयाला आले. या किल्ल्यावर मानाजी आंग्रेने हल्ला चढविला परंतु हा किल्ला अतिशय मजबुत असल्यामुळे तो अनेक दिवसांपर्यंत जिंकता आला नाही. परंतु लवकरच या ठिकाणी बाजीराव येवून पोहोचला.[५२] बाजीरावाने समोरुनच किल्ल्यावर प्रखर हल्ला चढविला. मानाजी आंग्रे याने समुद्र मार्गे हल्ला चढवून सिद्दीचे त्या ठिकाणचे आरमार त्याने नष्ट केले. परंतु एवढे प्रखर हल्ले होवूनही किल्ल्यातील शिबंदीने लढा तसाच चालू ठेवला. आणि त्यामुळे किल्ल्याचा ताबा हाती घेणे कठीण होऊन बसले. याचवेळी सिद्दीने पोर्तुगीजांकडे मदतीची विनवणी केली. तसेच इंग्रजांकडे सुरतेच्या सुभेदाराकडे आणि हैद्राबादच्या निजामाकडेही त्याने मदतीची याचना केली. या मधल्या काळात मराठ्यांनी खोशकरी, नागोठणे, निजामपूर, बिरवाडी इ. सिद्दींची ठाणी जिंकून घेतली.

ज्यांच्याकडे सिद्दीने पत्रव्यवहार केला त्यांचा मात्र त्याला विशेष प्रतिसाद मिळाला नाही. पोर्तुगीजांनी मात्र दोन जहाजे पाठविली पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. इंग्रजांनी आम्हाला फक्त व्यापार करावयाचा आहे असे सांगून मदत नाकारली. अशारितीने सिद्दीला बाहेरुन मदत मिळू शकली नाही याचा फायदा मराठ्यांनी घ्यावयास हवा होता. परंतु त्यांना तो घेता आला नाही. २० मे रोजी प्रतिनिधीला आनंदराव सरलष्कर, कृष्णाजीराव दाभाडे आणि इतर सरदारांसह बाजीरावाच्या मदतीला आला. परंतु त्यामुळे बाजीरावाचा स्वारीतील उत्साह मावळला. अशा स्थितीत ८ जून १७३३ रोजी प्रतिनिधीने रायगडचा किल्ला जिंकून घेतला तर बंकाजी नाईकाने गोवळकोट या ठिकाणी सिद्दीचा पाडाव केला. त्यामुळे मराठ्यांची प्रतिष्ठा वाढली.

**<u>सिद्दीला इंग्रजांची मदत</u> –**

जंजिरा, अंजनवेल, गोवळकोट या सारखी महत्वाची ठिकाणे सोडून सिद्दीने जवळजवळ आपला सर्व प्रदेश मराठ्यांना गमावला. अशारितीने कोकणात मराठ्यांना वर्चस्व प्राप्त झाल्यामुळे त्यांची भिती इंग्रजांना वाटू लागली. कारण आतापर्यंत आंग्र्यांनी इंग्रजांना बराच उपद्रव दिल्यामुळे त्यांचेच वर्चस्व स्थापन होणे सिद्दीच्या दृष्टीने योग्य नव्हते. अशाच परिस्थितीत सेखोजी आंग्रेने एक इंग्रज जहाज पकडले. त्यामुळे इंग्रज दुखावले गेले. त्यांना या घटनेचा सूड घ्यावयाचा होता म्हणून त्यांनी एक लढाऊ जहाज कॅप्टन हाल्डेन याच्या नेतृत्वाखाली पाठविले.[५३] उंदेरी बेटाला आंग्र्यांनी वेढा दिला तो वेढा आपल्या मदतीने सिद्दीने उठवावा असाच त्यामागील हेतू होता. परंतु आंग्र्यांनी या इंग्रजांच्या लढाऊ जहाजावर असा काही जबरदस्त हल्ला चढविला की इंग्रजांना माघार घेण्यावाचून दुसरे गत्यंतर उरले नाही. सप्टेंबर महिन्यात इंग्रजांनी अधिक कुमक पाठविली परंतु त्याचवेळी सेखोजी आंग्रेचा मृत्यृ झाला म्हणून मराठ्यांची परिस्थिती नाजूक बनली होती. सेखोजीच्या मृत्युनंतर संभाजी आणि मानाजी यांच्यात यादवी युध्दाला प्रारंभ झाला. मराठी आरमाराचे सेनापती पद दोघांनाही हवे होते. 'परिस्थिती चिघळू नये म्हणून शाहू दोघांनाही दुखवू इच्छित नव्हता. या नंतरचे सर्व आदेश शाहूने साताऱ्यावरुनच दिले. परंतु त्याचा युध्दावर अत्यंत विपरीत परीणाम घडून आला. सिद्दी आणि इंग्रज यांना पुन्हा सागरावर वर्चस्व प्राप्त करता आले. निजामाने सिद्दीशी पुन्हा मैत्री करण्याचे प्रयत्न चालविले. निजामाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याकरिता चिमाजी आप्पाला पुण्यात मुक्काम करुन रहावे लागले. वास्तविक चिमाजीने कोकणात बाजीरावाच्या मदतीला जाणे आवश्यक होते. यातच सिद्दी मसूर हा सुरतेवरुन जंजीऱ्याच्या सिद्दीला मदतीला जात आहे अशा वार्ता मिळू लागल्या.[५४] उमाबाई दाभाडे आणि दमाजी गायकवाड यांना सिद्दी मसूदच्या हालचालींवर नजर ठेवण्याकरिता नेमले होते. परंतु बाजीरावाबाबत त्यांच्यात द्वेषभावना असल्याने त्यांनी उदासिनता दाखविली. पेशवा आणि प्रतिनिधी यांच्यातही वैरभाव असल्याने प्रतिनधी हात राखून काम करीत होता. या सर्वांचा परिणाम म्हणून कोकणच्या स्वारीत आता मराठ्यांवर पराजित होण्याचा प्रसंग येवून ठेपला. वास्तविक या स्वारीच्या प्रारंभी मराठ्यांना सर्वत्र विजय मिळत होते. परंतु नंतर आपापसातील चुरशीमुळे त्यांना पराभवाचे सावट दिसू लागले. आपापसातील भांडणे यामुळेच कोकण मोहीमेत अपयश घेण्याचा प्रसंग

बाजीरावावर येऊन ठेपला.

**बाजीरावाचे तहाचे प्रयत्न -**

कोकण मोहीमेत अपयश येणार असे दिसू लागताच तहाचे प्रयत्न चालविले. उघड उघड पराभव पत्करण्यापेक्षा तह करणे बरे अशी बाजीरावाची यामागील विचारसरणी होती. डिसेंबर १७३३ मध्ये अलीबागचा तह करण्यात शेवटी बाजीरावाला यश लाभले.[५५] या तहान्वये जंजिऱ्याचा प्रमुख अब्दुल रहमान याला मान्यता देण्यात आली. रायगड आणि महाड सोडल्यास इतर सर्व मुलूख सिद्दीला परत करण्यात आला. हा तह केल्यानंतर १७३४ मध्ये बाजीराव साताऱ्याला परत आला. तहामुळे मात्र कोणाचेही समाधान झाले नाही. बाजीराव परत आला तरी शाहूच्या आज्ञेवरुन संभाजी आंग्रे आणि प्रतिनिधी यांनी हे युध्द पुढे चालविले. या त्यांच्या मोहीमेत उदाजी पवार, देवराव मेघश्याम, सेख मिरा इ. सरदारांनी सामील व्हावे असा आदेश शाहूने दिला. परंतु प्रतिनिधीजवळ किल्ल्यावर चालविता येण्यासारख्या तोफा नसल्यामुळे त्यांना या मोहीमेत यश लाभले नाही. अशा स्थितीत १७३५ मध्ये बाजीराव आणि पिलाजी जाधव हे प्रतिनिधीच्या मदतीला पुन्हा धावून आले. तथापी मोहीम जिंकण्याच्या दृष्टीने त्याचा काहीही उपयोग झाला नाही. उलट सिद्दीसात हा दिवसेंदिवस जास्त सामर्थ्यवान बनत गेला. इतकेच नव्हे तर मराठ्यांच्या मुलखावर त्याने हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. तेव्हा शाहूने चिमाजी आप्पाची त्यांच्या बदोबस्ताकरिता नेमणूक केली. चिमाजी आप्पा २० मार्च १७३६ रोजी कोकणात येऊन पोहोचला. रेवसजवळ शराई या ठिकाणी चिमाजी आप्पा आणि सिद्दीत सात यांच्यात लढाई घडून आली. त्या लढाईत सिद्दीचा पराभव होऊन त्यात तो ठार झाला.[५६]

**शराईच्या लढाईचे परिणाम -**

शराईच्या लढाईत मराठ्यांना फार मोठे नुकसान सहन करुन विजय मिळाला. सिद्दी लढाईत ठार मारला गेल्यामुळे ब्रह्मेंद्रस्वामींना आणि मराठ्यांना मोठे हायसे वाटले. अंजनवेल आणि गावलकोट ही दोन ठिकाणे मात्र सिद्दीकडेच कायम राहिली. त्याचबरोबर या लढाईमुळे पेशव्यांचे वर्चस्व सिध्द झाले. कोकणात त्यांना आव्हान देण्याची कुणाचीही हिंमत राहिली नाही. याचवेळी आंग्रे घराण्यात आपापसांत यादवी निर्माण होवून ते घराणेही दुर्बळ झाल्यामुळे पेशवे कोकणात अधिकच बलिष्ठ बनले. संभाजी आणि मानाजी या दोघा भावांत ज्यावेळी सेनापती पदाबाबत विवाद निर्माण झाला त्यावेळी बाजीरावाने त्यांच्या भांडणात हस्तक्षेप करुन ते भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला. परंतू बाजीरावाला त्यात यश आले नाही. म्हणून त्याने त्या दोघाही भावांत जहागिरीची आणि अधिकारांची समान वाटणी करुन दिली. या वाटणीमुळे तर आंग्रे घराणे अधिकच दुर्बळ बनले. याचा संपूर्ण फायदा बाजीरावाला मिळाला. बाजीरावाची कोकणवरील पकड पक्की होत गेली. उलट आंग्रे घराणे निष्प्रभ होत गेले.

**पोर्तुगीज मराठा संघर्ष पहिली अवस्था (१७३१-३२) -**

कोकणात अशारितीने बाजीरावने सिद्दी आणि आंग्रे यांची सत्ता दुर्बळ करुन टाकली. आता कोकणात पोर्तुगीज तेवढेच स्पर्धक उरले होते. त्यांची सत्ता नष्ट झाल्यास बाजीरावला कोकणात कोणीच स्पर्धक उरणार नव्हता. पोर्तुगीजांनी

आंग्रे घराण्यातील भांडणात संभाजीच्या बाजूने भाग घेतला होता. पण त्याच्याही पूर्वी पोर्तुगीज आणि मराठे यांच्यात अनेक कारणांवरुन वितुष्ट निर्माण झालेले होते. पश्चिम किनाऱ्यावर आपले व्यापारी ठाणे प्रस्थापित करताना पोर्तुगीजांनी तिथल्या हिंदू प्रजेशी जी वर्तणूक ठेवली होती ती अत्यंत निंद्य होती. जागोजागी त्यांनी जबरदस्तीने धर्मांतरे घडवून आणली होती. हिंदू प्रजेवर त्यांनी सतत अत्याचार केले होते. हिंदूंची देवळे पाडून त्यांनी जागोजागी चर्चेस बांधली होती. जबरदस्तीने हिंदूना ख्रिश्चन केले होते.[५७] पोर्तुगीजांच्या अत्याचारांनी पिडीत झालेले अनेक हिंदू महाराष्ट्रात आश्रयाला आले होते. यापैकी साष्टी येथील पाठारे प्रभु जमातीने अत्याचार करणाऱ्या पोर्तुगीजांचा पूर्ण नाश केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती. त्यांचा पुढारी गंगाजी नाईक हा होता. त्यांनी पोर्तुगीजांविरुध्द संभाजी आणि त्यानंतर कान्होजी आंग्रे यांची मदत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला यश लाभले नाही. इ.स. १७२० मध्ये ज्यावेळी बाजीराव सत्तेवर आला त्यावेळी रामचंद्र महादेव जोशी याच्या मार्फत पेशव्यांना आपल्या बाजूने वळवून घेण्याचा प्रयत्न केला पण अनेक कारणांमुळे बाजीरावाला पोर्तुगीजांच्या उपद्रवाकडे लक्ष देता आले नाही म्हणून इ.स.१७३० मध्ये अंताजी रघुनाथ, रामचंद्र रघुनाथ मालाडचे देशपांडे इत्यादी प्रतिष्ठीत व्यक्तिंनी बाजीरावाची भेट घेऊन पोर्तूगीजांच्या अत्याचाराकढे बाजीरावाचे पुन्हा लक्ष वेधले. त्यामुळे बाजीरावाला कारवाई करणे आवश्यक होऊन बसले. १७३१ मध्ये बाजीरावाने पिलाजी जाधवाला पोर्तुगीजांविरुध्द पाठविले त्याबरोबर कृष्णाजी महादेवालाही दिले. त्या दोघांनी पोर्तुगीजांचे कॅम्बे हे ठाणे जिंकून घेतले.[५८] २७ फेब्रुवारी, १७३१ रोजी पोर्तुगीज आणि मराठे यांच्यात जोरदार चकमक उडाली आणि त्यात पोर्तुगीजांचा पराभव झाला. त्यामुळे पोर्तुगीजांनी मराठ्यांशी तात्पुरता मैत्रीचा तह केला[५९] आणि काही काळ पोर्तुगीत मराठा संबंधात शांतता प्रस्थापित झाली.

**<u>मराठा पोर्तुगीज संघर्ष – दुसरी अवस्था –</u>**

१७३२ च्या सुमारास गोव्यामध्ये पोर्तुगीजांचा सॅन्डोमीन नावाचा नवीन गर्व्हनर आला.[६०] त्याने मराठ्यांसंबंधी आक्रमक धोरण स्वीकारले. हिंदूवर त्याने उघडपणे धार्मिक अत्याचाराला प्रारंभ केला. वाडीच्या सावंतावर त्याने हल्ला केला. १७३४ मध्ये पोर्तुगीजांनी ठाण्याला किल्ला बांधण्यास प्रारंभ केला. याचा सुमारास आंग्रे घराण्यात वारसा विवादाला प्रारंभ होऊन मानाजी आणि त्यानंतर संभाजी या दोघांनाही पोर्तुगीजाची मदत मागावी लागली. यावेळी पेशव्यांनी यशस्वीपण मध्यस्थी करुन दोघाही आंग्रे बंधुंमध्ये समेट घडवून आणला. त्याचबरोबर पोर्तुगीजांशी पेशव्यांनी करार केला आणि त्यानुसार साष्टी बेटावर वखार उघडण्याची अनुमती मिळविली. साष्टीच्या सेनापतीने या वखारीकरिता जागा निवडावी असे स्पष्ट करण्यात आले. परंतु साष्टीचा सेनापती याचवेळी पोर्तुगालला निघून गेल्यामुळे वखारीकरिता जागा निवडण्याचे काम पोर्तुगीज गर्व्हनरचा पुतण्या लुई बोटॅल्हो याजवर येऊन पडले. तो तापट आणि रागीट स्वभावाचा होता. मराठ्यांबद्दल त्याच्या मनात द्वेषाची भावना होती. त्यामुळे बाजीरावाचा वकील व्यंकोजी जोशी हा ज्यावेळी वखारीची जागा ठरविण्याकरिता गोव्याला आला त्यावेळेस लुईने त्याला अत्यंत अपमानास्पद रीतीने वागविले वखारीकरिता जागा देण्याचे तर त्याने नाकारलेच आणि वकीलाच्या समक्ष त्याने बाजीरावाला निग्रो

म्हणून शिवी दिली. हा वृत्तांत ऐकून बाजीराव संतप्त झाला. आणि त्याने पोर्तुगीजांचा सूड घेण्याचे निश्चित केले. स्वारीची तयारी अत्यंत जलद रीतीने करण्यात आली. ही लढाई पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांच्या ताब्यात असणाऱ्या अनेक किल्ल्यांवर, ठाण्यांवर आणि बेटांवर लढण्यात आली. पनवेल पासून ते ठाण्याजवळ अंजून आणि कळवे इ. प्रदेशात पाठारे प्रभुची वस्ती होती. त्यांचे आणि पोर्तुगीजांचे पक्के भांडण होते. त्यामुळे या प्रदेशातील पाठारे प्रभुही या युध्दात सामील झाले. या स्वारीची तयारी बाजीरावाने अतिशय गुप्तपणे केली होती. पुण्याला भवानीमातेचा उत्सव होता त्यामुळे मराठी सैन्य एकत्रित करण्यात आले. जत्रा असल्यामुळे लढाईची सिध्दता होत आहे. याचा संशयही कोणाला आला नाही. शंकराजीपंत याची सेनापती म्हणून नेमणूक करण्यात आली. वसईच्या स्वारीचा प्रमुख म्हणून गंगाजी नाईक आणि साष्टीच्या स्वारीचा प्रमुख म्हणून खंडोजी मांडकर याची नेमणूक करण्यात आली मराठ्यांची लढाईची अशी तयारी चालू असताना पोर्तुगीजांना मात्र त्याचा पत्ता नव्हता. मात्र इंग्रजांनी पोर्तुगीजांना सावध करण्याचा प्रयत्न केला. परंतु पोर्तुगीज सेनापती नॉर्थ याने मराठ्यांना कसे तोंड द्यावयाचे हे आम्हाला चांगले माहित आहे असे दर्पोक्तीयुक्त उत्तर पाठवून इंग्रजांच्या सूचनेची अवहेलना केली. अशा परिस्थितीत ६ एप्रिल १७३७ रोजी अंताजी रघुनाथ आणि रामचंद्र जोशी यांनी ठाण्याच्या किल्ल्यावर हल्ला केला.[६१] तोफांच्या माऱ्याचे आवाज ऐकू आल्यामुळे चिमाजी आप्पा हाही या मराठी सरदारांच्या मदतीला धावून आला. परंतु मराठा सरदारांनी पोर्तुगीजांचा पराभव करुन ठाण्याचा किल्ला अगोदरच जिंकलेला आहे असे त्याला दिसून आले. पोर्तुगीजांनी रात्रभर मराठ्यांशी तीव्र लढा दिला परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. अशा रीतीने ठाण्याचा किल्ला मराठ्यांच्या हाती सहजपणे आला. त्यानंतर चिमाजी आप्पाने शंकराजी केशव, चिमणाजी भीवराव या सरदारांना घेऊन साष्टीकडे मोर्चा वळविला. साष्टी ही त्यांच्या हाती सहज आली. त्यानंतर मराठ्यांनी धारावी, अर्नाळा इ. ठाणे जिंकून घेतली. यानंतर मराठ्यांनी वसई जिंकण्याचा निश्चय केला. वास्तविक मराठा सैन्य ताबडतोब वसईकडे गेले असते तर कदाचित मराठ्यांना वसईचा किल्ला ताबडतोब मिळू शकला असता. कारण वसईमध्ये कोणाचाच पायपोस कोणाच्याच पायात नव्हता पोर्तुगीजांच्यात दुही होती. आणि त्यामुळे त्याचा फायदा मराठ्यांना झाला असता. दुर्दैवाने मराठ्यांनी वसईवर हल्ला कसा चढवावयाचा याच्या योजनावरच विचार करण्यातच बराचसा वेळ दवडला. हल्ला करण्याची संपूर्ण योजना निश्चित होईपर्यंत पावसाळ्याला प्रारंभ झाला आणि मोहिम पुढे ढकलावी लागली. शंकराजीपंत आणि गंगाजी नाईक यांना वसईला ठेऊन जुलै १७३७ मध्ये चिमाजीआप्पा पुण्यात परतला. मध्यंतरीच्या काळात त्या दोघांनी वसईच्या किल्ल्याच्या भिंतींवर चढून किल्ला ताब्या घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना यश लाभले नाही. एवढ्यातच लुई बोटॅल्हो याच्या जागी अंतोनिया होज याची गव्हर्नर पदावर नेमणूक झाली.[६३] दरम्यान बाजीराव उत्तर हिंदुस्थानात स्वारीवर निघून गेला. परिणामी वसईची स्वारी मंदावली. नंतरचे हिवाळ्यात वसईचे मोहिमेला प्रारंभ झाला.

**<u>वसईची मोहिम –</u>**

पोर्तुगीज मराठा संघर्षाच्या दुसऱ्या अवस्थेला १७३८ च्या उत्तरार्धात प्रारंभ झाला. या दुसऱ्या अवस्थेत मराठे

आणि पोर्तुगीज या दोघांनीही एकमेकांची शक्ती परीक्षा केली. यावेळेपर्यंत पोर्तुगीजांना पोर्तुगालहून नवीन शस्त्रास्त्रांची कुमक येवून पोहोचली. म्हणून १७३८ च्या सप्टेंबर महिन्यात त्यांनी ठाणे मराठ्यांकडून जिंकण्याची योजना आखली. परंतु मुंबईच्या इंग्रज गर्व्हनरने मराठ्यांना वेळवर सावध केल्यामुळे पोर्तुगीजांची ही योजना फसली. त्यामुळे इंग्रज वरकरणी तटस्थतेचा आव आणतात परंतु प्रत्यक्षात ते पोर्तुगीजांविरुध्द नाना प्रकारच्या कारवाया करतात आणि विशेषत: मुंबईचे इंग्रज हे पोर्तुगीजांबद्दल सहानुभूती ठेवत नाहीत अशी तक्रार पोर्तुगीज करु लागले. एवढेच नव्हे तर इंग्रज गर्व्हनरने मराठ्यांना दारुगोळा आणि तोफा चालविणारे शिपाई दिले असाही आरोप त्यांनी केला. या कालखंडात मराठ्यांची उत्तरेतील मोहिम संपुष्टात आली होती आणि बाजीराव आता पोर्तुगीजांकडे लक्ष देण्याला मोकळा झाला होता. ही पोर्तुगीजांविरुध्दची मोहिम १७३८ च्या नोव्हेंबर महिन्यात सुरु झाली. वसई मोहिमेचा सेनापती म्हणून चिमाजीअप्पाची नेमणूक करण्यात आली. चिमाजीआप्पाने दमण पासून दीव पर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या हालचालींनी ढवळून काढला. ठिकठिकाणी ठाणी उभारली याठाण्यांची देखरेख स्वत: चिमाजी अप्पा करीत असे. पोर्तुगीज वसाहतींवर हल्ले चढवावेत आणि त्यांना कोणतीही रसद मिळू नये अशी एकंदर चिमाजीची योजना होती. या योजनेत चिमाजीला अतिशय थोड्या अवधीत यश मिळाले असते परंतु तेवढ्यातच मुंबईचा गर्व्हनर जॉन होर्न याची बदली झाली आणि त्याच्या जागी स्टीफन लॉ याची नेमणूक झाली. या नव्या गर्व्हनरने मराठ्यांची सर्व मदत थांबवून पोर्तुगीजांना मदत देण्यास प्रारंभ केला. इंग्रजांच्या धोरणात अशाप्रकारे बदल झाल्यामुळे चिमाजीलासुध्दा आपल्या लढाईच्या योजनेत त्यानुसार बदल करावे लागले. सर्व तयारी झाल्यानंतर चिमाजीने युध्द मोहिमेला जोरात प्रारंभ केला. माहिम, तारापोर, अळवे, डहाणू, नारगोळ इ. ठिकाणे त्यांनी जिंकून घेतली. त्याचबरोबर गोव्यावरसुध्दा स्वारी करण्यात आली. व्यंकटराव घोरपोडे हा १२ हजार फौज घेऊन गोव्यात शिरला आणि त्याने त्या ठिकाणी फार मोठा प्रदेश बेचिराख करुन टाकला. मडगाव जिंकल्यानंतर त्याने आपला मोर्चा राचोल किल्ल्याकडे वळविला. गोव्याचा गर्व्हनर काऊंट सॅन्डो मिल याने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु मराठा आक्रमकांच्या लाटांवर लाटा येऊन कोसळल्यामुळे त्याचा प्रतिकार विफल ठरला. तरीसुध्दा साध्यासुध्या पोर्तुगीज सैनिकानी आपली बाजू जिवंत ठेवण्याचा बराच प्रयत्न केला. गोव्यात सक्तीची लष्करभरती जारी करण्यात आली. वर्सोवा आणि कारंजा ही दोन ठाणी मराठ्यांच्या ताब्यात आली. वसईचा वेढा आता अधिकच कडक करण्यात आला. वास्तविक याचवेळी वसईचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात यावयाचा परंतु ऐनवेळी स्टीफन लॉ याची कुमक येऊन पोहोचल्यामुळे तो प्रसंग टळला याचवेळी पोर्तुगीजांचा सेनापती सिल्व्हेरिया हा मृत्यू पावल्याने पोर्तुगीज अधिकच निराश झाले. अशारीतीने वसईचा पाडाव हा काही दिवसांचाच प्रश्न ही गोष्ट उघड झाली. मराठ्यांनी किल्ल्यांवर तोफांचा मारा सतत चालविला होता. अर्ध्या अर्ध्या तासांच्या अंतराने सुरुंग फुटत होते. त्यात मराठ्यांची अतोनात हानी होत होती. चिमाजी आप्पा, मानाजी आंग्रे, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे यांचा सैन्यासह किल्ल्याची तटबंदी चढून आत जाण्याचा निकराचा प्रयत्न चालला होता. सॅन सॅबॅस्टेन या बुरुजावर तर मराठ्यांनी अकरा वेळा हल्ला केला १४ मेला सुरुंगाचा भडका

उडून सॅबॅस्टेनचा बुरुज पूर्णपणे जमीनदोस्त झाला. अशावेळेस पोर्तुगीजांनी शरणागती पत्करावी असे मराठ्यांना वाटणे स्वाभाविक होते पण पोर्तुगीजांनीही पराक्रमाची शर्थ केली. शेवटी नाईलाज झाला कुठुनही मदत मिळण्याची आशा संपली. पोर्तुगीज सैन्यही थकले. तेव्हा पोर्तुगीजांनी शरणागतीचा निर्णय घेतला. या विजयाच्या क्षणी देखील मराठे उदारतेने वागले. किल्ल्यातील पोर्तुगीज सैन्याला त्यांनी किल्ला सोडून सुरक्षित निघून जाण्याची अनुमती दिली. मराठ्यांच्या उदार वर्तणूकीची सर्वत्र प्रशंसा झाली. उभय पक्षात झालेल्या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.मरठ्यांनी पोर्तुगीज सैनिकांना किल्ल्याबाहेर सन्मानाने जाऊ द्यावे. ज्या हिंदू, ख्रिश्चन आणि मुसलमान कुटुंबियांना इतरत्र जाण्याची ईच्छा असेल त्यानां जाण्यास मराठ्यांनी अनुमती द्यावी पोर्तुगीज आणि ख्रिस्ती धर्मगुरुंना शांतपणे पोर्तुगालाला जाण्याची अनुमती द्यावी. ज्यांना वसईत राहण्याची ईच्छा असेल त्यांना वसईत राहू द्यावे. युध्द कैद्यांची आपापसात अदलाबदल करावी. वसईचे किल्ल्यातून पोर्तुगीज सैन्य पूर्णपणे निघून जाईपर्यंत मराठा सैन्याने वसईच्या किल्ल्यात प्रवेश करु नये. वसईतल्या चर्चेसना मराठ्यांनी धक्का लावू नये.उभय पक्षांच्या तहावर सह्या होईपर्यंत पोर्तुगीजांनी आपला प्रतिनिधी मराठ्यांकडे ठेवावा.

मराठ्यांनी या तहाचे काटेकोरपणे पालन केले. गोव्याचा वेढा मात्र अजूनही चालूच होता. शेवटी मराठ्यांचा सेनापती व्यंकटराव याने वसईची मोहिम आटोपल्यनंतर आमचे सर्व सैन्य गोव्याला येईल आणि सुरुंग लावून आम्ही सर्व शहरच बेचिराख करु अशी धमकी दिली. यावेळेपर्यंत वसईचा विजय मराठ्यांच्या दृष्ठोत्पत्तीस आला होता. त्यामुळे परीस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी मराठ्यांशी सन्मानपूर्वक तह करुन गोव्याची लढाई संपुष्टात आणणे श्रेयस्कर होईल असा शहाणपणाचा विचार गोव्याच्या राज्यपालांनी केला. आणि म्हणून त्याने तहाच्या वाटाघाटींना प्रारंभ केला. परीणामी २७ एप्रिल १७३९ रोजी गोव्याचा गर्व्हनर आणि व्यंकटराव यांच्यात एक मित्रत्वाचा करार करण्यात आला. त्यानुसार साष्टी आणि बॉरड या दोन जिल्ह्यातून मराठ्यांनी निघून जावे आणि याच्या मोबदल्यात पोर्तुगीजांनी त्याना एक लाख साठ हजार इतकी नुकसान भरपाई द्यावी असे टरले. याशिवाय पोर्तुगीजांनी मराठ्यांना एकूण महसूलाच्या १/६ हिस्सा वार्षिक खंडणी म्हणून देण्याचे मान्य केले. [६४]

**<u>पोर्तुगीज युध्दाचे परीणाम –</u>**

या युध्दात पोर्तुगीजांची अतिशय हानी झाली. ७५ मैल क्षेत्रफळाचा प्रदेश त्याना गमवावा लागला. त्यात ८ मोठी शहरे २० बंदरे, आणि वसई सारखे महत्वाचे किल्ले यांचा अंतर्भाव होता. साष्टी बेट मराठ्यांच्यादृष्टीने अतिशय फायदेशीर ठरले. तांदूळ आणि मीठ यांचे उत्पादन याठिकाणी भरपूर होते. १७४० पर्यंत दमण आणि त्या सभोवारचे काही जिल्हे एवढाच प्रदेश पोर्तुगीजांकडे राहिला. युध्दात पोर्तुगीजांची आर्थिक हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली. थोडक्यात या युध्दामुळे पोर्तुगीजांची सत्ता खिळखिळी झाली. पश्चिम किनाऱ्यावर मराठा आणि इंग्रज या दोनच सत्ता शिल्लक राहिल्या मराठ्यांनी सिद्दी आणि पोर्तुगीज याना नामोहरम केल्यामुळे पश्मिम किनाऱ्यावर मराठ्यांची प्रतिष्ठा वाढली.

**इंग्रजांचे सावध धोरण –**

मराठ्यांनी पोर्तुगीजांचा जो पराभव केला. त्यामुळे इंग्रज मराठ्यांशी दबकून वागू लागले. मराठ्यांना खूश करण्याकरिता इंग्रजांनी आपले दोन वकील एक पेशव्यांकडे व दुसरा छत्रपतींकडे पाठविला. कॅप्टन इंच बर्ड हापेशव्यांना भेटण्याकरिता आला तर कॅप्टन गोल्डान हा शाहूला भेटण्याकरिता साताऱ्याला आला. कॅप्टन इंच बर्ड पहिल्यांदा चिमाजी अप्पाला भेटला. परंतु चिमाजी अप्पाना त्याचे अतिशय थंड स्वागत केले. परीणामी इंच बर्डची वकीली पूर्णपणे अयशस्वी ठरली. इंग्रजांचा दुसार वकील कॅप्टन गोल्डान हा ज्यावेळी साताऱ्याला पोहोचला त्यावेळी छत्रपती शाहू मिरजेच्या स्वारीवर गेला होता. गोल्डानने मिरजेला प्रस्थान केले. दि. ८ जून रोजी शाहू आणि गोल्डान यांची भेट घडून आली परंतु शाहू यावेळी नादीरशहाच्या आक्रमणाच्या वार्तेने अतिशय चिंतीत झाला होता परंतु एवढ्यातच व्यंकटरावाने पोर्तुगीजांचा पराभव केल्याची बातमी येऊन थडकली त्यामुळे शाहूची परिस्थिती सुधारुन त्याने गोल्डान चे यथोचित स्वागत केले.इतकेच नव्हे तर इंग्रजांशी मैत्री करावी असेही त्याने बाजीरावाला सुचविले. अशारीतीने गोल्डान शिष्टाई यशस्वी झाली. शाहूच्या सूचनेवरुन बाजीरावाने इंग्रजांशी मेत्रीचा तह केला आणि आपल्या राज्यात इंग्रजांना सर्व व्यापारी सवलती दिल्या. बाजीरावाला उत्तर हिंदुस्थानातच केवळ विजय मिळाले असे नव्हे तर तो कोकणातही सर्वश्रेष्ठ ठरला.

**बाजीरावाचे काही उल्लेखनीय मदतनीस –**

मराठ्यांच्या बाजीरावकालीन साम्राज्यविस्ताराच्या योजनेत त्याला चिमाजी आप्पाची जशी मोठी मदत झाली तसेच त्याच्या इतर काही सरदारांचीही उल्लेखनीय मदत झालेली आढळते. अशा कर्तबगार आणि उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे. राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड व गोविंदपंत बुंदेले होय.

**राणोजी शिंदे –**

शिंद्यांचे घराणे सातारा जिल्ह्यातील कण्हेर खेडचे घरची गरीबी असल्याने त्याने प्रथम बाळाजी कवश्वनाथाच्या पागेत बारगिराची नोकरी पत्करली. लवकरच त्याच्यावर पेशव्यांची मर्जी बसली. राणोजी शिंदे, उदाजी पवार व मल्हारराव होळकर हे आरंभी बाजीरावाबरोबर खेळगडी म्हणून एकत्र वाढले असा समज आहे असे सरदेसाई म्हणतात. परंतु त्यासाठी ते आधार देत नाहीत . त्यामुळे त्यांचे म्हणणे मान्य करणे अवघड ठरते.

निजामाबरोबर झालेल्या बाजीरावाच्या संघर्षात राणोजीने निष्ठा आणि शौर्य हे गुण दाखविले. तेव्हा बाजीरावाने त्याला माळवा आणि हिंदुस्थानच्या कामगिरीवर पाटविले. चिमाजी आप्पाने माळव्यात दया बहाद्दरला बुडवीला त्या युध्दात राणोजी शिंदे होता. त्याने त्या युध्दात पराक्रमाची शर्थ केली.[६५] चिमाजी आप्पाच्या ग्वाल्हेरच्या स्वारीत राणोजी शिंदेनी गुजरातेतील कामगिरी करुन माळव्यात उतरावे अशी योजना करण्यात आली होती.[६६] यावरुन राणोजी शिंदेच्या कामगिरीबद्दलचा पेशव्यांच्या ठायी असलेला विश्वासच प्रगट होतो. सुप्रसिध्द वसईच्या लढ्यातही राणोजी शिंदेचा सहभाग होता.[६७] य.न.केळकरांनी त्याचे वर्णन पेशव्यांच्या ठेवणीतील वीररत्न असा केलेला

आढळतो.[६८] कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांनी होळकर, शिंदे पवार इ. ना बाजीरावाचे राजकारणी शिष्य म्हटले आहे.[६९] आणि त्यांच्यामते प्रत्येकाचीच कामगिरी वाखाणण्याजोगी झाली आहे त्यामुळे त्यांच्यात प्रतवारी लावणे कठीण आहे असे मत दिले आहे.

राणोजी शिंदेजवळ स्पष्टवक्तेपणा व वेळप्रसंगी धन्याची भीडभाड न ठेवण्याचा स्वभाव होता. शिंदेच्या घराण्याचा मराठेशाहीच्या इतिहासाशी निकटचा संबंध आहे. इतकेच नव्हे तर पाऊण शतकाचा इतिहास एका घराण्याने बनविलेला आहे असे म्हणण्यास चिंता नाही.[७०] असे जे सरदेसाईनी मत व्यक्त केले आहे ते रास्तच होय.

**<u>मल्हारराव होळकर –</u>**

होळकरांचे मूळ नाव विरकर असून पुणे जिल्ह्यातील होळ या गावावरुन होळकर हे नाव रुढ झाले. मल्हारराव होळकराचा जन्म १५ किंवा १६ माचे १६९३ रोजी झाला. तो तीन वर्षाचा असतानाच वडील वारले. परीणामी आई त्याला घेऊन खानदेशात भोजराज बारगळ याच्याकडे गेली. तेथेच तो लहान लहान लढायात शौर्याची कामे करुन प्रसिध्दीस आला. १७२० च्या बाळापूरच्या लढाईत मल्हाररावाने चांगलाच पराक्रम केला. १७२१ पासून तो बाजीरावाकडेच राहू लागला. १७२५ मध्येच बाजीरावाने त्याला २५०० स्वारांची मनसब दिली. बाजीरावाच्या माळव्याच्या स्वारीत पेशव्याबरोबर इतर अनेक कर्त्या माणसांबरोबर मल्हाररावही हजर होता. प्रत्यक्ष युध्दाला तोंड लागले तेव्हाही तो मैदानावर हजर होता. मैदानावर गाजविलेल्या पराक्रमाबद्दल पेशव्यांनी त्याचा खास गौरव केला. इ.स.१७२९-३० मध्ये चिमाजी आप्पाने काढलेल्या पेटलादच्या स्वारीतही मल्हारराव होळकराने महत्वाची भूमिका बजावली. त्या स्वारीत मांडवगड घेण्यात त्याचा आणि उदाजी पवाराचा सिंहाचा वाटा होता.[७१] वसई मोहिमेच्या वेळेस पेशव्यांनी आपला बहुतेक फौजफाटा व सरदार कोकणात उतरविले त्यातही मल्हारराव होळकर होताच.[७२] त्या युध्दात लढताना मल्हाररावाच्या पायाला जखमही झाली होती. १७३९ मध्ये झालेल्या वसईच्या युध्दात मराठ्यांना जो विजय मिळाला त्याच्या मानकऱ्यांमध्ये मल्हाररावाचे नांव निश्चितपणे घ्यावे लागते.

**<u>गोविंदपंत बुंदेले –</u>**

बुंदेले हे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील नेवरे या गावचे. मूळ आडनाव खेर असे असून पुढे त्यांना बुंदेले हे उपनाव प्राप्त झाले. वडील वारल्यानंतर तो कोकण सोडून देशावर आला. नोकरी साठी हिंडताना तो बाजीरावाकडे आला. काही काळ त्याने मल्हारराव होळकराजवळही काम केले असावे असे सरदेसाई म्हणतात. गोविंदपंताच्या अंगचे गुण हेरुन बुंदेलखंडाची व्यवस्था पहाण्यास बाजीरावाने त्याची नेमणूक केली. बाजीरावासारख्याच्या नजरेत भरण्यासारखी कामगिरी गोविंदपंतानी करुन दाखविली. १७२९ च्या माळव्याच्या लढ्यात गोविंदपंत हजर होता एवढेच नव्हे तर पुढे बाजीरावाचा मुलगा बाळाजी बाजीराव याच्या काळातही गोविंदपंत बुंदेले उत्तरेतच वावरत होता. तथापि गोविंदपंताने बाजीरावाच्या मराठा साम्राज्य विस्ताराच्या काळातच आपला जम बसविला. लवकरच उत्तरेतील प्रमुख मराठा सरदारांमध्ये त्याची गणना होऊ लागली. हळूहळू त्याने नवीन किल्ले बांधले व ठाणी हस्तगत केली.

कुरईच्या नबाबाकडून त्याने काही प्रांत हस्तगत केला त्यात सागर म्हणून एक प्रचंड तलाव होता या तलावाच्या काठी सागर नावाचे नवीन शहर वसवून तेथे गोविंदपंताने आपले वास्तव्य कायम केले. सागरची स्थापना १७३६-३७ मध्ये झाली असावी असे सरदेसाई म्हणतात. नानासाहेब पेशव्याच्या काळात सदाशिवरावभाऊने त्याच्यावर ५ लक्ष सैन्यास रसद पोहोचविण्याची जबाबदारी सोपविली होती. तसेच अब्दालीची रसद तोडण्याचीही कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली होती. त्याने अब्दालीच्या सैन्याची रसद तोडण्याचा तडाखा लावलातेव्हा अब्दालीने अतायिखान व करीमदखान यांना गोविंदपंतावर रवाना केले . त्यांनी त्याच्यावर हल्ला करुन त्याचे शिर कापून त्याच्या छावणीची लूट केली ही घटना २० डिसेंबर १७६० रोजी घडली.[७३]

**बाजीरावाच्या ध्येयाची मिमांसा -**

शाहू आणि पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या निर्धाराने मराठी सत्तेची उभारणी बरीचशी व्यवस्थित अशी झाली होती. त्या पेशव्याने पूर्णपणे नाही तरी बऱ्याच यशस्वीपणे मराठ्यांना संघटित करुन रणांगणावर आणून उत्तरेची दिशा दाखविली होती. तथापि, त्या दिशेने हिंमतीने आणि वेगाने पुढे जाणे आवश्यक होते. तसेच इतर दिशांनाही हातपाय पसरणे भाग होते. क्रमप्राप्त अशी ही कामगिरी बाजीरावाच्या अंगावर पडली, आणि दोन दशके (१७२०-४०) त्यानी ती समर्थपणे पार पाडली. तथापी बाजीरावाने हा जो उत्तरेकडे आपला मोर्चा वळविला त्याच्यामागे त्याचे कोणते ध्येय होते हा आजही वादाचा मुद्दा झालेला दिसतो. सरदेसाई बाजीरावाच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांचे ध्येय स्पष्ट करताना त्याचा उद्देश स्वधर्म (हिंदू) प्रतिष्ठा वाढविण्याचा होता असे म्हणतात.[७४]

सरदेसाईप्रमाणेच डॉ.श्रीनिवासन यांनी बाजीरावाला हिंदु स्वातंत्र्याचा कैवारी ठरविले आहे.[७५]

सावरकर लिहितात, ''हिंदु स्वातंत्र्याच्या महत्कार्याच्या पुरस्काराकरिता कोणाही पुरुषाने बाजीरावापेक्षा अधिक मनोभावे आणि अधिक यशस्वीतेने प्रयत्न केले नाहीत. हिंदुपदपातशाहीचे महद्ध्येय शक्य तितक्या त्वरेने साध्य करण्यासाठी त्यांना तसे जिवापाड अतिमानवी प्रयत्न करावे लागले. त्यामुळे त्यांना अकाली मरण आले. नादिरशहाच्या दहा आक्रमणांनी देखील कधीही बसला नसता इतका मोठा धक्का बाजीरावाच्या अकाली निधनाने हिंदूंच्या कार्याला बसला.''[७६]

सरदार ण्णीकर,राजवाडे, सेन इत्यादी इतिहासकारांनाही बाजीरावाच्याबद्दल हिंदुंचा पुरस्कर्ता, हिंदु पदपादशाहीचा जन्क असा अभिप्राय व्यक्त केलेला आढळतो. तथापी त्याच्या अगदी उलट डॉ.दीघे , प्रा.आठवले यांनीही आपले मत नोंदविलेले आढळते.

डॉ.दीघे म्हणतात'' जयपूर, जोधपूर, उदेपूर, बुंदेले यांचेकडे मराठ्यांची नेहमी चौथ-सरदेशमुखीची, जहागिरीची मागणी चालावयाची आणि राजेरजवाड्यांनी याबाबत खळखळ करावयाची हे काय मैत्रीचे द्योतक का हिंदू संघटनेचे? सर्व राजे रजवाड्यांनी मैत्रीच्या नात्याने त्यांचा संघ बनविला आहे, त्यांनी पातशाहीचा कारभार कोणत्या धोरणावर चालावावयाचा, परस्परांचे संबंध कसे असावे, यासंबंधी विवेचन तत्कालीन कागदपत्रात मिळत नाही तो

पर्यंत बाजीरावाच्या हिंदुधर्माच्या आस्थेबद्दल मुग्धताच बाळगली पाहिजे. गोब्राह्मण प्रतीपालन, काशीप्रयाग तिर्थक्षेत्र सोडविणे या निव्वळ घोषणा होत. सर्व हिंदू सत्ताधीशांची एकजूट झाल्याचा देखावा अठराव्या शतकात दिसत नाही.''[७७]

प्रा.सदाशिव आठवले यांनी असाच अभिप्राय व्यक्त केला आहे . ते म्हणतात,''शाहूचे हिंदुपदपादशाहीचे धोरण कोणत्याही अस्सल कागदपत्रात नमूद नाही. दिल्लीच्या बादशाहीशी इमान राखण्याचे करारमदार करुन स्वराज्याच्या सिंहासनावर बसलेल्या शाहूने ''दिल्लीपतीचा दक्षिणेतील सुभेदार निजाम याचेशी जपून वागावे, हे समजण्यासरखे आहे पण हे सगळे राजकारण झाले यात हिंदू कारण कोठे आहे? तसेच पुढे जाऊन ते म्हणतात पण मनातून अंती हिंदुच्याच रक्षणासाठी कटिबध्द होते असे म्हटले तर त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मोहिमात हिंदू प्रजाजनांची जी लूटमार झाली तिचा अर्थ समजणे अवघड आहे.''[७८]

बाजीरावाच्या एकूण साम्राज्यविस्ताराचा विचार करताना कै.दत्तोपंत आपटे यांनी ''थोरल्या बाजीरावाच्या ध्येयाची मीमांसा'' या लेखात असे म्हटले आहे की, शाहूला बाजीरावाच्या उत्तरेकडील मोहीमांची योजना संमत झाली. निदान त्याने आक्षेप घेण्याचे सोडून दिले. याचा सरळ अर्थ असा होतो की, निजामाच्या बाबतीत नरमाईचे धोरण स्वीकारणारा तसेच बादशाहीला धक्का लावू नये. अशा मताचा असणारा छत्रपती शाहू एक प्रकारे बाजीरावाच्या साम्राज्य विस्तारास छत्रपती या नात्याने मूक संमतीच देत होता. आणि केवळ पेशवेच साम्राज्य वादी होते आणि छत्रपती शाहू नव्हताच असे नाही. रघुजी भोसलेला बंगालमध्ये धाडणाऱ्या शाहूंच्या त्या कृतीचा अर्थ साम्राज्यवादी असाच लावला पाहिजे. तसेच बाजीरावाला छत्रपती शाहूची संमती असल्याशिवाय बाजीरावही असे धाडस करणे शक्य नव्हते. कारण अंतीमत: पेशवा हा छत्रपती नौकरच होता.

वरील विद्वानांची मते ध्यानात घेतानाच बाजीरावाने उत्तरेकडचा मार्ग स्वीकारला याचे कारण दक्षिणेची कामगिरी बाजीरावाने पत्करली असती तर प्रतिनिधीची चुरस आड आली असती व प्रतिनिधीस गप्प बसवून बाजीरावास दक्षिणेवर पाठविण्याचे काम आपण करणार आहोत, असे ठासून सांगण्याचे काम शाहूच्या हातून होण्याचा फारसा संभव नव्हता.

बाजीरावाच्या अंगी विरवृत्ती होती. पण धोरणात्मक निर्णय त्याला घेता येत नव्हता. अशा परिस्थितीत आपण आपल्या पराक्रमास स्वतंत्र क्षेत्र आखून घेऊन त्यात कामगिरी करावी. या विचारास बाजीरावाच्या मनात प्राधान्य मिळाले. आपल्याकडील फौज कायम ठेवावी व तिच्या हातून होईल ती कामगिरी करवावी हा हिमतीचा मार्ग बाजीरावाने पत्करला त्यायोगे त्याला व्यापक कल्पना सुचल्या पण त्यांचा मेळ मराठी राज्यातील अितर सरदारांच्या कल्पनेशी बसला नाही.

तथापी बाजीरावाने उत्तर हिंदचे राजकारण केले. त्यामागे हिंदुपदपादशाहीचा विचार असेलच असे नाही परंतु त्याच्या एकामागोमाग एक अशा स्वाऱ्यांमुळे मराठ्यांचा साम्राज्यविस्तार विशेषत: उत्तरेकडे अधिक झाला. द.ब.आपटे यांच्या मतानुसार आपल्या विरुध्द पक्षाच्या सरदारांपेक्षा आपण आहोत हे सिध्द करुन व शाहूचा मान राखून सातारा

दरबारात जसे आपणास महत्वाचे स्थान प्राप्त करुन घेता आले त्याचप्रमाणे दिल्ली दरबारात आपले वजन कायम करता येईल अशी विचारसरणी बाजीरावाच्या उत्तर हिंदुस्थानातील धोरणाच्या मुळाशी होती.[७९] वरील वेगवेगळ्या मतांचा परामर्ष घेतल्यानंतर हे स्पष्ट होते की, दत्तोपंत आपटे यांचे मत अधिक वास्तववादी ठरते. कारण मराठे जिवंत आहेत, ही गोष्ट जशी त्यास पटवून द्यावयाची होती तशीच स्वत:चे महत्व वाढविण्याची महत्वाकांक्षाही त्याला होतीच.

# संदर्भ टिपा


१) V.G.Dighe, Peshwa Bajirao First & Maratha Expansion, Bombay 1944, p 204

२) अ.रा.कुलकर्णी आणि ग.ह.खरे, मराठ्यांचा इतिहास, खंड २, पुणे १९८५, पृ. १३५-३६

३) म.रि. खंड ३, पृ. २३७

४) पे.द. खंड १०, लेख ७५

५) त्र्यं.शं.शेजवलकर, नि.पे.सं., पुणे १९५९, पृ. १४, ४२ ते ४४

६) वि.गो.खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास, खंड २, मुंबई १९८८, पृ. ७८

७) पे.द. खंड १५, लेख ८६

सदर करार एकूण १७ कलमांचा आहे.

८) पुणे पुराभी लेखागारातील अप्रकाशित कागद दफ्तर क्रमांक १, पुडके क्र. १, कागद क्र. १७९५

९) यु.एम.जौंजाळ, अप्रकाशित एम.फील. शोध प्रबंध, निजाम पेशवे संबंध, कोल्हापूर १९९२, पृ. ४१, ४२

१०) भा.इ.स. मं. त्रै जून १९३४ पृ. २९-३१

११) खोबरेकर, उपरोक्त पृ. ११६

१२) कित्ता पृ. ११८

१३) पेद खंड १५, लेख ४५

१४) कित्ता खंड १२, लेख १५

१५) कित्ता खंड १५, लेख ६५, ६८, ६९

१६) कित्ता खंड १४, लेख ९

१७) पुणे पूराभी लेखागारातील अप्रकाशित कागद, दफ्तर क्रमांक १, पुडके क्र.४, पत्र क्र. ६५०

१८) पुणे पूराभी लेखागारातील अप्रकाशित कागद, दफ्तर क्रमांक १, पुडके क्र.२, पत्र क्र. १५१६

१९) पे.द.खंड १४, लेख १६, १७, १८

२०) कित्ता, लेख १६, १७, १८

२१) कित्ता, लेख १३

२२) कित्ता, खंड २२, पृ. १६३

२३) कित्ता, खंड १४, लेख २३

२४) कित्ता, खंड २२, पृ. १६३

२५) कित्ता, खंड २२, लेख ४१-४२

२६) कित्ता, खंड ३०, पृ. ३२१

२७) खोबरेकर, उपरोक्त, पृ. १२१

२८) कित्ता

२९) पे.द. खंड ३०, लेख १५६

३०) कित्ता, लेख १६७

३१) कित्ता, लेख १३४

३२) कित्ता खंड ३, लेख १९२

३३) कित्ता खंड २५, लेख १७

३४) कित्ता खंड १५, लेख ३०

३५) राजवाडे, म.इ.सा., खंड ६, लेख १३१

३६) V.G.Dighe, Peshwa Bajirao p. 153

३७) ग.ह. खरे, निवडक लेख, पुणे १९७२ पृ. १३१

३८) सिध्देश्वरशास्त्री चित्राव, मध्ययुगीन चरित्र कोष, पुणे १९३७ पृ. ३७९

३९) पिसुर्लेकर, पो.म.सं., पृ. १६१ आणि य.न.केळकर, वसईची मोहिम, पुणे १९३७, पृ. १३२, ३३

४०) चित्राव, उपरोक्त, पृ. ३८०

४१) म.रि. खंड ३ पृ. ३२४

४२) कृ.वा.पुरंदरे, चिमाजी आप्पा आणि पेशवे यांची चरित्र, पुणे १९४८, पृ. ७

४३) शा.रो., पृ. ७

४४) कित्ता, पृ. ६१

४५) राजवाडे, म.इ.सा., खंड ३, लेख १

४६) म.रि. खंड ३, पृ. ४३३,

४७) धावडशी येथे राहून स्वामीने बागबगीचे फुलविले त्याचे सुरेख वर्णन डॉ.प्र.ल.सासवडकरांनी काही अप्रकाशित कागदपत्रांच्या सहाय्याने केलेल आढळते. पहा. भारतीय इतिहास आणि संस्कृती वर्ष २ रे पुस्तक ५वे रियासतकारांनी त्याचे केलेले मूल्यमापनही योग्य वाटते. पहा म.रि. खंड ३ पृ. ४३६ ते ४३

४८) राजवाडे, म.इ.सा. खंड २ पृ. ५९

४९) कित्ता, खंड ३, लेख ३०५

५०) म.रि.खंड ३, पृ. ४०७

५१) या.मा.काळे, गो.स.सरदेसाई, (संपा.) का.सं.प. पुणे १९३० पृ. ४४-४५.

५२) शा.रो. पृ. ५९,६०

५३) म.रि. खंड ३, पृ. ४१७

५४) कित्ता

५५) राजवाडे, म.इ.सा. पृ. ८७-८८

५६) म.रि.खंड ३, पृ. ४२१

५७) पिसुर्लेकर, पो.म.सं. पृ. १४७

५८) कित्ता

५९) कित्ता, पृ. १४८

६०) म.रि.खंड ३, पृ. ५२६

६१) पिसुर्लेकर, उपरोक्त पृ. १५५

६२) ग.गो.नाईक, साष्टीची बखर, मुंबई १९३५ पृ. ४२

६३) म.रि.खंड ३, पृ. ५२६

६४) पिसुर्लेकर उपरोक्त पृ. १८०-२०१, केळकर वसईची मोहिम पृ. ११७ ते २२४, देसाई पो.म.सं.
पृ. १२९ ते १३२

६५) पुरंदरे उपरोक्त पृ. ११

६६) कित्ता

६७) केळकर उपरोक्त पृ. १८९,

६८) पुरंदरे उपरोक्त पृ. ९४

६९) कित्ता, पृ. ६९, पृ. ८०

७०) म.रि. खंड १, पृ. ३२५

७१) कित्ता, खंड ३,पृ. ५३८

७२) कित्ता, पृ. ३४०

७३) राजवाडे म.इ.सा. खंड ३, लेख ५११

७४) म.रि. खंड ३, पृ. ६२२

७५) Dr.C.K.Shrinivasan, Bajirao the great Peshva, Bombay 1961, p.138

७६) वि.दा.सावरकर, हिंदू पदपादशाही मुंबई १९४७, पृ. ५७

७७) कुलकर्णी आणि खरे, उपरोक्त पृ. ७७-७८

७८) म.रि.खंड ३, नवी आवृत्ती विभाग संपादकाचे मनोगत, पृ. २०९-१०

७९) द.ब.आपटे, लेखसंग्रह , पुणे १९४५, पृ. १३३-३६